- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार
संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, १२ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २४४ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# १५ ऑगस्टपासून कॉकरोचचा मोर्चा सरकारी शाळेकडे



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

गावागावातील सरकारी शाळांची दुरवस्था आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक सुविधांकडे होणारे दुर्लक्ष याविरोधात कॉकरोच जनता पार्टीने (सीजेपी) देशव्यापी अभियान सुरू करण्याची घोषणा केली आहे. पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी येत्या १५ ऑगस्टपासून या अभियानाला सुरुवात केली जाणार असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील सरकारी शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच नागरिक, पालक आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

अभिजीत दिपके यांनी व्हीडीओद्वारे या अभियानाची माहिती दिली. महाराष्ट्रातील हिंगोली जिल्ह्यातील त्यांच्या गावापासून या उपक्रमाची सुरुवात करण्यात येणार असून गावातील सरकारी शाळांची सद्यस्थिती सुधारण्यासाठी ते स्वतः सरपंचांशी संपर्क साधणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर देशभरातील इतर गावांमध्येही या उपक्रमाचा विस्तार करण्याचे सीजेपीचे नियोजन आहे. १५ ऑगस्ट हा भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन आहे. स्वातंत्र्याच्या आठ दशकांनंतरही ग्रामीण भागातील सरकारी शाळांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न कायम असल्याचे दिपके यांनी सांगितले. देशात मोठ्या पायाभूत सुविधा उभारल्या जात असताना गावातील सरकारी शाळांसाठी पुरेशा सुविधा का निर्माण होऊ शकल्या नाहीत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

ग्रामीण भागातील अनेक मुलांना आजही शाळेत जाण्यासाठी मोठे अंतर पार करावे लागते. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि इतर आवश्यक सुविधांचा अभाव असल्याचा दावा दिपके यांनी केला. शेतकरी आणि कामगारांच्या मुलांनाही देशाच्या भविष्यातील पीढी म्हणून समान संधी मिळायला हवी, असे त्यांनी म्हटले.

**सरकारी शाळांच्या सुधारणेला प्राधान्य**

या पार्श्वभूमीवर १५ ऑगस्टपासून सुरू होणा-या अभियानाचा केंद्रबिंदू सरकारी शाळांची स्थिती सुधारणे हा असेल, असे सीजेपीकडून सांगण्यात आले आहे. गावातील शाळांमध्ये नेमक्या कोणत्या सुविधा आहेत, कोणत्या सुविधा उपलब्ध नाहीत आणि कोणत्या बाबींमध्ये सुधारणा आवश्यक आहे, याचा आढावा घेण्यासाठी नागरिक आणि पालकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अभियानात गावातील सरपंच आणि स्थानिक नेतृत्वाची भूमिकाही महत्त्वाची राहणार आहे. आपल्या गावातील सरकारी शाळांची जबाबदारी स्वीकारून त्यामध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी सरपंचांनी पुढाकार घ्यावा, असे दिपके यांनी म्हटले आहे.

**सरपंच चॅलेंज मधून शाळांच्या सुधारणेला प्रोत्साहन**

सीजेपीने या उपक्रमाला सरपंच चॅलेंज असे नाव दिले आहे. आपल्या गावातील सरकारी शाळेची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रत्यक्ष काम करणा-या सरपंचांचा सन्मान करण्याची भूमिका पक्षाने घेतली आहे. शाळेच्या सुधारणेपूर्वी आणि सुधारणेनंतरची छायाचित्रे सोशल मीडियावर प्रसिद्ध करून संबंधित सरपंचांच्या कामाला श्रेय दिले जाणार असल्याचे दिपके यांनी सांगितले. एका गावातील शाळा सुधारली आणि त्याचा परिणाम इतर गावांतील सरपंचांवर झाला, तर त्यातून व्यापक बदल घडू शकतो, अशी भूमिका सीजेपीने मांडली आहे. चांगल्या कामाचे उदाहरण इतर गावांसमोर ठेवून अधिकाधिक स्थानिक लोकप्रतिनिधींना शाळांच्या सुधारणेसाठी पुढे आणण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जाणार आहे.

**नागरिकांच्या सहभागातून सरकारी शाळांचे ऑडिट**

सरकारी शाळांच्या परिस्थितीचा नागरिकांच्या नेतृत्वाखाली सामाजिक ऑडिट करण्याची घोषणाही उखढने केली आहे. शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या मूलभूत सुविधा, विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी आणि स्थानिक पातळीवर करता येणाऱ्या सुधारणांचा आढावा यावर भर दिला जाणार आहे. या अभियानात पालक, नागरिक, सरपंच आणि गावातील इतर स्थानिक नेतृत्वाने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ग्रामीण शैक्षणिक व्यवस्थेकडे केवळ सरकारची जबाबदारी म्हणून न पाहता समाजानेही त्यामध्ये सक्रिय भूमिका बजावावी, असा मेसेज उखढकडून देण्यात आला आहे.

**क्या बोलती पब्लिक ? ही मोहिम सुरू होणार**

देशभरातील नागरिकांशी आणि स्थानिक पातळीवरील प्रश्नांशी थेट संपर्क साधण्यासाठी सीजेपीने क्या बोलती पब्लिक? या अभियानाचीही घोषणा केली आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्थेशी संबंधित समस्या जाणून घेण्याचा आणि त्या सार्वजनिक चर्चेत आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या या अभियानातून ग्रामीण सरकारी शाळांच्या प्रश्नाला देशव्यापी पातळीवर चर्चेत आणण्याचा सीजेपीचा प्रयत्न आहे. आता या आवाहनाला देशभरातील सरपंच, पालक आणि नागरिकांकडून कितपत प्रतिसाद मिळतो आणि त्यातून प्रत्यक्ष शाळांच्या सुविधांमध्ये किती बदल घडतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

थोडक्यात

## मुख्य पायलटने गांजा सेवन केल्याचे निष्पन्न

**नवी दिल्ली :** फुकेटवरून दिल्लीला येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाची हवेत अचानक ३०० फूट उंची घसरून २५ जण जखमी झाल्याच्या दुर्घटनेत एक धक्कादायक माहिती समोर आली असून रिपोर्टनुसार, या विमानाच्या मुख्य वैमानिकाची (पायलट-इन-कमांड) दुसरी (कन्फर्मेटरी) डोप चाचणी पॉझिटिव्ह आली असून, त्याने गांजा सेवन केल्याचे प्रयोगशाळेच्या अहवालात निष्पन्न झाले आहे. ४ ऑगस्ट रोजी झालेल्या या घटनेनंतर दोन्ही वैमानिकांची सायकोॲक्टिव्ह सबस्टन्स चाचणी करण्यात आली होती. यामध्ये को-पायलटची चाचणी निगेटिव्ह आली, तर मुख्य पायलटचा प्राथमिक अहवाल संशयास्पद आढळल्याने नमुने विशेष प्रयोगशाळेत पाठवण्यात आले होते. सध्या दोन्ही वैमानिकांना उड्डाण कर्तव्यावरून हटवण्यात आले आहे. एअर इंडियाच्या एआय२३७९ (एअरबस एअ३२०) या विमानात १३७ प्रवासी आणि ८ कर्मचारी उपस्थित होते. प्रवासादरम्यान अचानक विमानाची उंची ३०० फुटांनी घटल्याने २० प्रवासी आणि ४ केबिन क्रू सदस्य जखमी झाले. या घडामोडीनंतर वैमानिकांनी विमानावर नियंत्रण मिळवत दिल्लीत सुरक्षित लँडिंग केले.



## मित्रासोबत हायवेवर थांबलेल्या तरुणीला डाक बंगल्यावर नेले, ६ जणांकडून सामूहिक अत्याचार

### तिघे अटकेत

**वृत्तसंस्था, पालघर**

राज्यातील महिलांवरील, तरुणींवरील लैंगिक अत्याचाराच्या घटना काही केल्या कमी होताना दिसत नाहीत. एकीकडे सरकार महिलांवरील अत्याचाराच्या बाबती गंभीर असून पोलिसांनाही तातडीने कडक कारवाईचे निर्देश दिले आहेत. मात्र, महिलांवरील अत्याचाराच्या घटना कमी होताना दिसत नाहीत. आता, सामूहिक लैंगिक अत्याचाराच्या घटनेनं पालघर जिल्ह्यातील तलासरी हादरलं आहे. आपल्या मित्रासोबत दुचाकीवरुन फिरण्यासाठी गेलेल्या तरुणीवर सहा जणांकडून सामूहिक लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या संतापजनक घटनेनं पालघर जिल्हा हादरला आहे.



पालघरच्या तलासरी पोलीस ठाणे हद्दीतील ही घटना असून पीडित मुलीच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल केला आहे. मित्रासोबत महामार्गावर उभं असताना दोन बाईकवरून आलेल्या सहा जणांनी एका बंद पडलेल्या डाक बंगल्यात नेत १९ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याचं तक्रारीत म्हटलं आहे. याप्रकरणी, तलासरी पोलीस ठाण्यात सहा आरोपीं विरोधात गुन्हा दाखल असून तीन आरोपींना अवघ्या काही तासातच अटक करण्यात आली आहे. तर, इतर तीन फरार असून आरोपींचा शोध सुरू आहे.

१९ वर्षीय तरुणीने पोलिसांत तक्रार दिली की, ती तरुणी तिच्या मित्रासह दुचाकीवरुन फिरायला गेली होती, दरम्यान खामगाव येथे त्यांची दुचाकी स्लीप झाल्याने ते खाली पडले. त्याचवेळी पाठीमागून दुचाकीवर आलेल्या तीन इसमांनी तरुणीच्या मित्राला दमदाटी करुन हाकलून लावले. त्यानंतर, दुचाकीवरील तिघांनी आणखी तीन जणांना बोलावून घेतले. तसेच, पीडित तरुणीला जबरदस्तीने दुचाकीवर बसवून खामगावजवळील एका बंद डाक बंगल्यावर नेले, या बंगल्याच्या कट्ट्यावर सहा जणांकडून तरुणीवर सामूहिक अत्याचार करण्यात आला, अशी फिर्याद तलासरी पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी देखील तत्परतेनं तीन आरोपींना अटक केली आहे. तसेच, त्यांच्यावर बीएनएस ७०/१ नुसार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, घटनास्थळी पोलीस अधीक्षकांनीही भेट दिली असून इतर आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती तलासरी पोलीस निरीक्षक अजय गरुड यांनी दिली.

## भूकंपाचे आतापर्यंत २०० बळी



**वृत्तसंस्था, बोगोटा**

दक्षिण अमेरिकेतील कोलंबिया देशात सोमवारी रात्री आलेल्या ७.४ तीव्रतेच्या भूकंपात आतापर्यंत २०० जणांचा मृत्यू झाला असून ८०० जण जखमी झाल्याची माहिती आहे. अधिकाऱ्यांच्या मते, देशभरात ८६ इमारती कोसळल्या, तर १,५०० हून अधिक घरांचे नुकसान झाले आहे. १८ आरोग्य केंद्रे आणि ५२ शाळांनाही नुकसान झाले आहे. याशिवाय ७ विमानतळांवरील काम थांबवण्यात आले आहे.

पाच शहरांमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. राष्ट्रपतींनी आपत्कालीन समितीची बैठक बोलावून मदत आणि बचाव कार्यावर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. एकट्या पेरेरा शहरात १०० जणांचा मृत्यू झाला आहे. सुमारे ५ लाख लोकसंख्या असलेले हे शहर भूकंपाच्या केंद्रापासून ६४ किलोमीटरपेक्षा कमी अंतरावर आहे. राजधानी बोगोटासह अनेक शहरांमध्येही तीव्र धक्के जाणवले. खबरदारी म्हणून लोक इमारतींमधून बाहेर पडून रस्त्यावर आले.

**चोको आणि रिसाराल्डा येथे मोठे नुकसान**

अमेरिकन भूगर्भीय सर्वेक्षणनुसार, भूकंप सोमवारी सकाळी ७:३४ वाजता आला. याचे केंद्र चोको परिसरात सॅन जोसे डेल पालमारजवळ होते. भूकंपाची खोली १०७ किलोमीटर होती.

## तब्बल २७ वर्षानंतर सूर्यग्रहणामुळे भरदिवसा रात्र होणार

**वृत्तसंस्था, मुंबई**

१२ ऑगस्ट रोजी वर्षातील दुसरे आणि शेवटचे सूर्यग्रहण होणार आहे. हे सूर्यग्रहण अनेक अर्थांनी खास असणार आहे. कारण जगातील काही भागांमध्ये दिवसा आकाशात अंधार पसरलेला पाहायला मिळू शकतो आणि एक अद्भुत खगोलीय नजारा अनुभवता येणार आहे. मात्र, १२ ऑगस्टचे सूर्यग्रहण भारतातून दिसणार नाही.

वर्ष २०२६ मधील दुसरे आणि शेवटचे सूर्यग्रहण होणार आहे. हे सूर्यग्रहण अनेक कारणांमुळे विशेष ठरणार आहे. असे सूर्यग्रहण पाहण्याची संधी तब्बल काही दशकांनंतर मिळत असल्याचे सांगितले जात आहे. हे ग्रहण पाहण्याची संधी हुकली, तर अशाच प्रकारच्या पुढील सूर्यग्रहणासाठी ६४ वर्षांपर्यंत प्रतीक्षा करावी लागू शकते. वैज्ञानिकांच्या मते, काही भागांमध्ये ग्रहणाच्या वेळी असे वातावरण निर्माण होईल की, दिवसा अचानक रात्र झाल्यासारखे वाटेल. १२ ऑगस्ट रोजी लागणारे हे सूर्यग्रहण खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे. जसजसा चंद्र सूर्याच्या समोर येईल, तसतसा सूर्याचा मोठा भाग चंद्राच्या सावलीत झाकला जाईल.

ग्रहण कळसाच्या जवळ पोहोचल्यावर आकाशातील प्रकाश मोठ्या प्रमाणात कमी होईल. चंद्र सूर्याचा सुमारे ९० टक्के भाग झाकेल. चंद्र सूर्याला झाकत जाईल, तसतसा प्रकाश कमी होत जाईल आणि काही काळासाठी अक्षरशः रात्र झाल्यासारखे दृश्य दिसेल. यादरम्यान तापमानातही काही प्रमाणात घट जाणवू शकते आणि आजूबाजूचे वातावरण बदललेले दिसू शकते. मात्र, ही स्थिती काही काळापुरतीच असेल. ग्रहण संपल्यानंतर सूर्यप्रकाश पुन्हा दिसू लागेल आणि वातावरण हळूहळू पूर्ववत होईल.

**कुठे-कुठे दिसणार सूर्यग्रहण ?**

या सूर्यग्रहणाचे सुंदर दृश्य युरोपातील काही भाग आणि उत्तर अटलांटिक क्षेत्रातून पाहता येणार आहे. ब्रिटन, स्पेन, आइसलँड आणि ग्रीनलँड या प्रमुख ठिकाणांचा त्यामध्ये समावेश आहे. १९९९ नंतर १२ ऑगस्ट २०२६ रोजी असे दुर्मिळ सूर्यग्रहण पाहायला मिळणार आहे. त्यानंतर अशाच प्रकारचे सूर्यग्रहण २३ ऑगस्ट २०९० रोजी दिसणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या दुर्मिळ खगोलीय घटनेचे साक्षीदार होणाऱ्या लोकांसाठी हा अनुभव निश्चितच खास असणार आहे.



Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : बुधवार, १२ ऑगस्ट २०२६

संपादकीय लेखणीतून...

## स्वामी विवेकानंदजींचे संस्मरण!

युवा हे समाजाचे शक्तिस्थान आहेत आणि त्यांच्या विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी आपण सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. जागतिक युवा दिन हा त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाची ओळख पटवून देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण संधी आहे. त्यामुळे या दिवसाचे महत्त्व ओळखून त्याचे योग्य प्रकारे पालन करणे आवश्यक आहे.

जागतिक युवा दिन दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. हा दिवस तरुणांच्या भूमिका, त्यांचे महत्त्व, आणि त्यांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी साजरा केला जातो. युवा हे समाजाचा भविष्य आहेत आणि त्यांच्यातील सामर्थ्य, जोश, आणि कल्पकता हे समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहेत. जागतिक युवा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. यात कार्यशाळा, चर्चासत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि युवा नेतृत्व विकास कार्यक्रमांचा समावेश असतो. या उपक्रमांद्वारे तरुणांना त्यांचे अधिकार, जबाबदाऱ्या, आणि समाजातील त्यांच्या भूमिकेची जाणीव करून दिली जाते. या दिनानिमित्त तरुणांच्या समस्यांवर चर्चा केली जाते. शिक्षण, रोजगार, मानसिक आरोग्य, आणि सामाजिक न्याय यांसारख्या विषयांवर लक्ष केंद्रित केले जाते. तसेच, तरुणांच्या आवाजाला महत्त्व देऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न केले जातात.

भारतात दरवर्षी १२ जानेवारीला राष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. हा दिवस स्वामी विवेकानंद यांच्या जन्मदिनाला समर्पित आहे. स्वामी विवेकानंद यांचा जन्म दि.१२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला. भारतात राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याची सुरुवात सन १९८५मध्ये झाली. तेव्हापासून आजपर्यंत दरवर्षी १२ जानेवारी हा दिवस युवा दिन म्हणून साजरा केला जातो. स्वामी विवेकानंद हे केवळ भारतातच नव्हे तर जगभर त्यांच्या विचार आणि आदर्शांसाठी प्रसिद्ध होते. लहान वयातच त्यांनी आपल्या कल्पनांनी जगभरात स्वतःची वेगळी प्रतिमा आणि ओळख निर्माण केली होती. त्यांनी नेहमीच तरुणांना त्यांच्या विचारांनी प्रेरित केले, म्हणूनच त्यांची जयंती युवा दिन म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला. सन १९८४साली संयुक्त राष्ट्र संघाने ते वर्ष आंतरराष्ट्रीय युवा वर्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर भारत सरकारने यावर विचार केला आणि तेव्हापासूनच दरवर्षी स्वामी विवेकानंदांच्या जयंती १२ जानेवारीला राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला. सन १९८५मध्ये देशात प्रथमच राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला.

**महत्त्व आणि उद्देश्य**- कोणत्याही देशाचा उत्तम विकास त्या देशातील तरुणांवर अवलंबून असतो. भारत हा तरुण लोकसंख्या असलेला देश आहे आणि देशाची प्रगती तरुणांवर अवलंबून आहे. त्यामुळे देशातील तरुणांना योग्य मार्गदर्शनासाठी हा दिवस साजरा केला जातो. विवेकानंदांच्या जयंतीनिमित्त युवा दिन साजरा करण्यामागचा उद्देश हा आहे की, युवकांनी विवेकानंदांच्या विचारांनी प्रेरित होऊन देशाच्या प्रगतीत हातभार लावावा. देशात राष्ट्रीय युवा दिनाच्या दिवशी सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये थीमसह स्पर्धा आयोजित केल्या जातात. याशिवाय मुले भाषणातून स्वामी विवेकानंदांचे अनमोल विचार सांगतात.

आंतरराष्ट्रीय स्तरावर १२ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी यानिमित्ताने युवकांशी निगडीत विशिष्ट पैलूवर चर्चा घडवून आणली जाते. यावर्षी "शांती स्थापनेत युवकांचा सहभाग- युथ बिल्डींग पीस" हे घोषवाक्य निश्चित करण्यात आले आहे. सृजनशील अशा युवा शक्तीच्या माध्यमातून जगभरात शांततेची स्थापना व्हावी हा यामागचा विचार आहे. संयुक्त राष्ट्रांनी १९८५मध्ये पहिले आंतरराष्ट्रीय युवा वर्ष साजरे केले. या घटनेच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त १९९५मध्ये जगातील युवावर्गाच्या स्थितीत अनुकुल बदल घडवून आणण्यासाठी "वर्ल्ड प्रोग्राम ऑफ अँक्शन फॉर युथ" स्वीकारण्यात येऊन त्या माध्यमातून मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्र महासभेने शिक्षण, रोजगार, गरिबी, आरोग्य, पर्यावरण, सहभाग, जागतिकीकरण, युवक आणि संघर्ष, एचआयव्ही एड्स आदी १५ क्षेत्रांची निवड प्राध्यान्याने केली. युवकांना मिळणाऱ्या संधींची संख्या वाढविणे, त्यांची गुणवत्ता वाढविणे आणि त्या माध्यमातून समाजासाठी युवकांचे योगदान वाढविणे यादिशेने या कार्यक्रमाद्वारे चांगले प्रयत्न झाले आहेत. लिस्बन येथे ८ ते १२ ऑगस्ट १९९८ दरम्यान पार पडलेल्या युवकांशी निगडीत मंत्र्यांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत १२ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याची शिफारस करण्यात आली आणि त्यावर १७ डिसेंबर १९९९ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने शिक्कामोर्तब केले. तेव्हापासून हा दिवस युवा दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो.

सुरक्षा परिषदेने आपल्या २०१५ आणि २०१६च्या ठरावात शांतीस्थापनेच्या प्रयत्नांना यश येण्यासाठी युवकांची भूमीका महत्त्वाची असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सामाजिक न्याय आणि शांतीस्थापनेच्या अशाच प्रयत्नांना यवर्षीच्या युवा दिनाच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले आहे. युवक हा समाजात बदल घडवून आणण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे. युवकांना नागरिकांचे अधिकार, सामाजिक न्याय आणि विश्वशांतीच्या महत्त्वाबाबत जागरूक केले तर जगात विविध पातळ्यांवर असणारे संघर्ष, वाद कमी होऊ शकतील. अशा अनुकुल बदलासाठी युवावर्ग निश्चितपणे पुढे येईल. जनसामान्यांच्या प्रगतीसाठी जागतिक शांततेचे महत्त्व लक्षात घेता शांतता प्रस्थापित करण्यात युवकांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. आजचा युवक ज्ञान आणि विज्ञानाच्या विश्वात वावरणारा आहे. मानवी मुल्ये आणि मानवी विकासाबाबत त्याला चांगली जाण आहे. विज्ञान- तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगातील अनेक समस्यांची उत्तरे शोधण्याची क्षमता त्याच्यात आहे. या क्षमतेचा उपयोग तो जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी निश्चितपणे करू शकतो. जागतिक युवा दिनाच्या निमित्ताने या भूमिकेबाबत चर्चा होणे आणि त्यादिशेने युवकांचा सहभाग वाढणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

# एआयच्या युगात ग्रंथालयांचा विकास आणि वास्तविकतेतील अंतर

राष्ट्रीय ग्रंथालयाध्यक्ष दिन विशेष



डॉ. प्रितम भि. गेडाम
नागपूर

शिक्षणाला उन्नत बनविण्यात ग्रंथालयांचे मुख्य योगदान असते, कारण ग्रंथालये ज्ञानरूपी केंद्र म्हणून सतत प्रज्वलित राहतात. एकेकाळी आपल्या देशात नालंदा, तक्षशिला यांसारखी समृद्ध विद्यापीठे होती, जिथली ग्रंथालये त्यांच्या विशाल समृद्धी आणि भव्यतेसाठी जगप्रसिद्ध होती आणि जगभरातून विद्यार्थी येथे ज्ञानप्राप्तीसाठी येत असत. आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञानाचा वापर केल्याशिवाय कोणतेही क्षेत्र विकसित होऊ शकत नाही, सर्वांना उन्नत आणि सुविधाजनक कार्यप्रणालीची आवश्यकता आहे. जागतिक स्तरावर सर्वत्र वेगाने माहितीचा विस्फोट होत आहे. ती माहिती योग्य स्तरावर अचूक स्वरूपात तिच्या वापरकर्त्यापर्यंत कमी वेळेत पोहोचविणे अत्यंत आवश्यक असते, हेच कार्य नवीन तंत्रज्ञानाद्वारे ग्रंथालये उत्कृष्ट स्वरूपात करतात. मुद्रित भौतिक पुस्तके, साहित्य यांची जागा आता वेगाने डिजिटल आणि ऑनलाइन संग्रह घेत आहेत. आज जगभरातील माहिती आणि वाचनसाहित्य केवळ एका क्लिकवर उपलब्ध आहे, त्यामुळे पारंपरिक ग्रंथालयेही डिजिटल होत आहेत.

परंतु आजही देशातील बहुतांश ग्रंथालये आपली दुरवस्थेची कहाणी सांगताना दिसतात. बहुतांश ग्रंथालयांमध्ये कौशल्यपूर्ण कर्मचाऱ्यांची मोठी कमतरता आहे, योग्य आणि नवनवीन वाचनसाहित्य नाही, योग्य देखभाल नाही, संसाधनांची कमतरता आहे, मूलभूत सुविधाही नाहीत, अनेक ग्रंथालयांच्या इमारती भग्नावस्थेत पोहोचल्या आहेत. निधीचा अभाव ही तर नेहमीचीच समस्या आहे. अशा ग्रंथालयांमध्ये असलेले मौल्यवान साहित्यसंग्रह मोठ्या प्रमाणात नष्ट होत आहेत. अशा परिस्थितीत ग्रंथालये आपल्या उद्दिष्टपूर्तीपासून दिवसेंदिवस दूर जात आहेत. अशावेळी सर्वात मोठ्या लोकसंख्येसाठी प्रगत डिजिटल ग्रंथालय हे केवळ एक स्वप्न बनून राहते. देशातील अनेक राज्य सरकारांकडून अनुदानित सार्वजनिक ग्रंथालयांतील कर्मचाऱ्यांच्या अत्यंत कमी वेतनाची समस्या अनेक दशकांपासून कायम आहे. महाराष्ट्र राज्य सरकारकडून अनुदानित बहुतांश शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये कुशल कर्मचारीच नाहीत, अनेक दशकांपासून पदभरती झालेली नाही; अनेक वरिष्ठ महाविद्यालयांचीही हीच परिस्थिती आहे. आता जर देशात सर्वत्र अशी समस्या दिसणार असेल, तर प्रगत ग्रंथालयांचे स्वप्न किती टक्के लोकसंख्येच्या वाट्याला वास्तवात येऊ शकेल?

केंद्र सरकारद्वारे संचालित शिक्षण संस्था, विद्यापीठे, महागडी खासगी संस्थाने ग्रंथालये विकसित करण्यावर भर देत आहेत. सध्या काही राज्ये आणि महानगरपालिकांनीही डिजिटल ग्रंथालयांच्या निर्मितीत सहभाग दिला आहे, परंतु हे अत्यंत कमी आहे. सर्वात मोठी लोकसंख्या म्हणजेच ग्रामीण, मागास भाग आणि आर्थिक मदतीअभावी असलेले क्षेत्र अत्यंत खराब स्थितीत आहेत. नवीन शिक्षण प्रणाली २०२० नुसार, शाळांना विकसित आणि सुविधासंपन्न बनविण्यासाठी मूलभूत सुविधा, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगणक कक्ष, सर्व विषयांचे तज्ज्ञ शिक्षक आणि कौशल्यपूर्ण कर्मचारी प्रत्येक शाळेत आवश्यक मानले गेले आहेत. नीती आयोगाच्या अहवालानुसार, सन २०१७-१८ ते २०२२-२३ दरम्यान देशातील ९२ हजार सरकारी शाळा बंद झाल्या. एक लाखांहून अधिक शाळा एका शिक्षकाच्या भरवशावर आहेत, तर ७९९३ शाळांमध्ये एकही विद्यार्थी नाही. प्राथमिक शाळेत प्रवेश घेणाऱ्या सुमारे ४० टक्के विद्यार्थ्यांना कधीच इयत्ता १२ वीपर्यंत पोहोचता येत नाही. अशा प्रकारे आपण देशभरात समान गुणवत्तेची राष्ट्रीय स्तरावरील शिक्षणव्यवस्थेचे योग्य व्यवस्थापन कसे प्रस्थापित करू शकू आणि जागतिक स्तरावरील शिक्षण धोरणाशी कशा प्रकारे समन्वय साधू शकू?

जगभरातील छोटे-छोटे देश आपल्या प्रगत तंत्रज्ञानाच्या बळावर विकसित आहेत. प्रत्येक नवीन तंत्रज्ञान आपल्याला नवी कौशल्ये, विकासाची रणनीती, सकारात्मक-नकारात्मक परिणाम आणि प्रगतीचा मार्ग दाखवते. जर तंत्रज्ञानाचे कौशल्यपूर्ण योग्य व्यवस्थापन केले, तर आपण जागतिक स्तरावरील सुविधासंपन्न केंद्रांची निर्मिती करू शकतो. आजच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ताही आपल्याला हीच संधी देत आहे की, एआयचा वापर आपल्या कार्यक्षेत्राला अधिक चांगले कसे बनवता येईल, ज्यामुळे वाचकांना उत्तम सेवांचा लाभ त्वरित मिळेल. हा लाभ देशातील प्रत्येक ग्रंथालयातील प्रत्येक वाचकापर्यंत सहज पोहोचला पाहिजे. एआय तंत्रज्ञान ग्रंथालय सेवांना अधिक प्रभावी आणि वापरकताकेंद्रित बनवत आहे. एआय हा ग्रंथालयाध्यक्षाचा पर्याय नसून, त्याची कार्यकौशल्यता आणि कार्यक्षमता वाढविणारे एक शक्तिशाली सहाय्यक साधन आहे.

ग्रंथालयात एआय वाचकांच्या विषयानुसार योग्य वाचनसाहित्याचा शोध, मार्गदर्शन आणि संशोधन विषयाचे विश्लेषण करून सूचना, संशोधनातील अंतर, साहित्य समीक्षा, प्रगत शोध प्रणाली, सूचीकरणात वेळेची बचत, मानवी चुका कमी करणे, जलद माहिती पुनर्प्राप्ती, संसाधनांचे अधिक चांगले संघटन, दुर्मिळ पुस्तकांचे दीर्घकालीन संरक्षण, बहुभाषिक माहिती सेवा, मागणीनुसार उत्कृष्ट वाचनसाहित्य संग्रह विकास, मजबूत ग्रंथालय प्रशासन, साहित्यिक चोरीची ओळख, संस्थात्मक ज्ञान व्यवस्थापन, माहिती साक्षरतेला प्रोत्साहन यांसह ग्रंथालयातील प्रत्येक विभाग आणि कार्यात एआय मदतगार ठरत आहे. तसेच एआयच्या नकारात्मक पैलूही न विसरता आपण सकारात्मक काम केले, तर वेळ, पैसा, पुस्तकसंग्रह आणि ज्ञानाचा अचूक वापर होईल आणि प्रत्येक वाचकापर्यंत त्याचे उत्कृष्ट साहित्य योग्य वेळी पोहोचेल आणि हेच ग्रंथालयाचे उद्दिष्ट आहे.

एक अनुभव सांगत आहे. काही वेळापूर्वी माझ्या आलेखाचे एका वाचकाचा, महाराष्ट्र राज्यातील खानदेश क्षेत्रातील ग्रामीण भागातील एका वृद्ध व्यक्तीचा मला फोन आला. ते गावातील तरुणांसाठी अनेक वर्षांपासून एक छोटेसे ग्रंथालय चालवत आहेत. त्यांनी आपली परिस्थिती आणि ग्रंथालयाची वास्तविकता सांगत आपली समस्या माझ्यासमोर मांडली. त्यांनी सांगितले की, ते ८३ वर्षीय पेन्शनधारक आहेत आणि पेन्शनच्या निधीवरच ग्रंथालय चालवतात; सरकारकडून किंवा लोकांकडूनही कोणतीही मदत मिळत नाही. पेन्शनही इतकी कमी आहे की, स्वतःचा उदरनिर्वाह मोठ्या अडचणीने करून ग्रंथालयासाठी काही वर्तमानपत्रेच खरेदी करू शकतात. पुस्तके खरेदी करण्यासाठी काहीही पैसे शिल्लक राहत नाहीत. गावातील लोकसंख्याही गरीब वर्गातील आहे. ग्रंथालयात अभ्यास करणारे विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे तरुणच अधिक येतात; आसपासच्या गावांमध्येही इतर कोणतेही ग्रंथालय नाही.

पुढे त्यांनी सांगितले की, गावातील तरुणांची शेवटची आशा हेच ग्रंथालय आहे. या ग्रंथालयाला सरकारी अनुदान मिळावे यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले, परंतु त्यांना कोणतेही यश मिळाले नाही. बोलता बोलता भावूक होऊन ते रडू लागले आणि म्हणाले की, "त्यांच्या निधनानंतर हे ग्रंथालय कायमचे बंद होईल," जे या स्थानिक तरुणांच्या अभ्यासाचा एकमेव आधार आहे.

ग्रंथालयांच्या विकासासाठी राज्य सरकारच्या योजना, केंद्र सरकारद्वारे संचालित योजना, याशिवाय स्थानिक प्रशासन, आमदार, खासदार आणि नेत्यांकडूनही सहाय्य निधी प्राप्त होतो. काही सेवाभावी संस्था, श्रीमंत समाजसेवी व्यक्तीही मदत करतात. इफ्ला, युनेस्को यांसारखे अनेक आंतरराष्ट्रीय संघही ग्रंथालय विकासात सहकार्य करतात. परंतु गांभीयार्ने विचार करण्याचा विषय असा आहे की, आपल्या देशात, समाजात, आजूबाजूला अनेक दशकांपासून अशी असंख्य ज्ञानरूपी ग्रंथालये आहेत, जी नष्ट होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचली आहेत; अनेक तर नष्टही झाली आहेत, परंतु आजही त्यांच्यापर्यंत योग्य मदत पोहोचू शकलेली नाही. प्रगत तंत्रज्ञान आणि मजबूत शिक्षणप्रणालीचा लाभ प्रत्येक स्तरातील, प्रत्येक वर्गातील व्यक्तीपर्यंत कोणत्याही अडथळ्याशिवाय पोहोचला पाहिजे, तेव्हाच सर्वांगीण विकास होऊ शकेल.

प्रत्येक ग्रंथालयाच्या विकासासाठी पुरेसा निधी, प्रगत संसाधने, उत्तम वाचनसंग्रह, उत्कृष्ट देखभाल आणि उच्चशिक्षित कौशल्यपूर्ण कर्मचारी असले पाहिजेत. अन्यथा शिक्षणाचे ज्ञानस्रोत केंद्र अर्थात ग्रंथालयांच्या विकासातील एआय तंत्रज्ञानरूपी ज्ञानसेवा मर्यादित वाचकवर्गापुरतीच राहू नये, जी शैक्षणिक गुणवत्तेतील दरी वाढविण्याचे एक साधन ठरू शकते.

**- महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत**

**मो. ०८२३७४१७०४१**

# न्यायालयाची सक्रियता: सत्तेचे संतुलन की अधिकारक्षेत्राबाहेर पाऊल?

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

कायदे करणे, योजना राबवणे, देशाचा वा राज्याचा कारभार चालवणे आणि प्रशासकीय निर्णय घेणे हे सरकारचे काम आहे. लोकशाही व्यवस्थेत धोरणात्मक व अंमलबजावणीचे अधिकार सरकारकडे असतात, तर कायद्याचे उल्लंघन झाल्यास किंवा अधिकारांचा गैरवापर झाल्यास त्यावर अंकुश ठेवण्याचे व अंतिम अर्थ लावण्याचे अधिकार न्यायालयाकडे असतात.

जेव्हा सरकार एखादा मोठा धोरणात्मक निर्णय घेते आणि त्यानंतर त्यावर सर्वोच्च किंवा उच्च न्यायालय आपला अंतिम शिक्कामोर्तब करते (किंवा त्याविरुद्ध निर्णय देते), तेव्हा 'कळस सरकारचा, निर्णय न्यायालयाचा' अशा प्रकारची वाक्ये चर्चेत येतात. एखाद्या विशिष्ट सरकारी योजनेवर झालेला न्यायालयीन निकाल, महाराष्ट्रातील राजकीय सत्तासंघर्ष किंवा निवडणुकांशी संबंधित कोटार्चा निर्णय,आरक्षण किंवा इतर मोठ्या सामाजिक मुद्द्यांवरील कायदेशीर सद्यस्थितीअशा कितीतरी प्रकरणांमध्ये न्यायालयाने निर्णय देत आपली सक्रियता वाढवली आहे.

न्यायालयीन सक्रियता हा भारतीय लोकशाहीतील अत्यंत महत्त्वाचा आणि वादग्रस्त विषय आहे. संविधानाने कायदेमंडळ कार्यपालिका आणि न्यायव्यवस्था यांच्यात सत्तेचे संतुलन राखले आहे. परंतु, जेव्हा न्यायालय आपल्या मर्यादेबाहेर जाऊन निर्णय देते, तेव्हा "ते सत्तेचे संतुलन राखत आहे की आपल्या अधिकारक्षेत्राबाहेर पाऊल टाकत आहे?" हा प्रश्न निर्माण होतो.

लोकशाही व्यवस्थेमध्ये सरकार (कार्यकारी मंडळ) आणि न्यायालय (न्यायमंडळ) या दोन्ही संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. भारतात सत्ता विभाजनाच्या तत्त्वानुसार दोन्ही यंत्रणा स्वतंत्रपणे काम करतात. जेव्हा सरकार एखाद्या विषयावर निर्णय घेऊ शकत नाही किंवा कामात दिरंगाई होते, तेव्हा न्यायालयीन हस्तक्षेपाकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले जाते.

न्यायालय थेट जनतेला उत्तरदायी नसते, तर सरकार जनतेद्वारे निवडून दिलेले असते. त्यामुळे अंतिम धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार सरकारकडेच असावा, असे मानले जाते. जेव्हा सरकारला धोरणात्मक



निर्णय घेण्यास अपयश येते, तेव्हा न्यायालय सक्रिय होऊन निर्णय देत असते. प्रशासकीय किंवा शासकीय पातळीवर दिरंगाई किंवा अनास्था असल्यास न्यायालय जनतेच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यासाठी पुढे येते. कायद्याचे राज्य टिकवून ठेवण्यासाठी आणि अधिकारांचा समतोल राखण्यासाठी न्यायालयांना ताशेरे ओढावे लागतात किंवा निर्णय द्यावे लागतात.

जेव्हा सरकार जनहिताचे निर्णय घेण्यात किंवा कायद्याची अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरते, तेव्हा न्यायालय नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यासाठी पुढे येते. सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि प्रशासनाला जागे करण्यासाठी न्यायालय आदेश जारी करते.यालाच न्यायालयीन सक्रियता म्हणतात.

न्यायालयीन सक्रियता म्हणजे जेव्हा देशातील न्यायव्यवस्था (सर्वोच्च आणि उच्च न्यायालय) स्वतःच्या पारंपारिक कार्यकक्षेच्या पलीकडे जाऊन, नागरिक हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी शासन किंवा प्रशासनाला थेट आदेश देते. भारतीय लोकशाहीत कायदेमंडळ, कार्यपालिका आणि न्यायव्यवस्था हे तीन प्रमुख स्तंभ आहेत. परंतु, जेव्हा पहिले दोन स्तंभ आपले घटनात्मक कर्तव्य बजावण्यात अपयशी ठरतात, तेव्हा न्यायव्यवस्थेला 'सक्रिय' भूमिका घ्यावी लागते.

**उदाहरणे**: प्रदूषण नियंत्रण, अन्न सुरक्षा आणि आपत्कालीन परिस्थितीतील व्यवस्थापन यामध्ये न्यायालयाने वेळोवेळी महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत.

समीक्षकांच्या मते, न्यायालयाने प्रशासकीय किंवा धोरणात्मक निर्णयांमध्ये जास्त हस्तक्षेप केल्यास त्याला 'न्यायालयीन अतिसक्रियता' म्हटले जाते.कायदे बनवणे हे संसदेचे आणि ते राबवणे हे सरकारचे काम आहे. न्यायालयाने थेट प्रशासन चालवण्याचा प्रयत्न केल्यास लोकशाहीचा समतोल बिघडू शकतो, असा एक मतप्रवाह आहे. न्यायालय थेट जनतेला उत्तरदायी नसते, तर सरकार जनतेद्वारे निवडून दिलेले असते. त्यामुळे अंतिम धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार सरकारकडेच असावा, असे मानले जाते.

खासदार आणि आमदार हे जनतेने निवडलेले प्रतिनिधी असतात, तर न्यायाधीश नियुक्त केलेले असतात. त्यामुळे न्यायाधीशांनी धोरणात्मक निर्णय घेणे लोकशाहीच्या विरोधात मानले जाते.

लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी सरकारने आपले कर्तव्य कार्यक्षमतेने बजावणे आणि न्यायालयाने कायदेशीर चौकटीत राहून त्यावर देखरेख ठेवणे या दोन्ही गोष्टी तितक्याच आवश्यक आहेत.

न्यायालयाची वाढती सक्रियता ही भारतीय लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी आणि नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी एक वरदान ठरली आहे. परंतु, न्यायव्यवस्थेने 'सक्रियता' आणि 'संयम' यामध्ये सुवर्णमध्य साधणे गरजेचे आहे. न्यायालयाने प्रशासनाला त्यांचे कर्तव्य बजावण्यास भाग पाडावे, मात्र स्वतः सरकार चालवण्याचा प्रयत्न करू नये, तरच लोकशाहीचे हे तिन्ही स्तंभ मजबूत राहतील.न्यायालयीन सक्रियता ही लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी एक 'गरज' आहे, परंतु त्याचे रुपांतर अतिक्रमणात होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. न्यायव्यवस्थेने सक्रिय असावे, परंतु कायदेमंडळ आणि कार्यपालिकेच्या कक्षेत हस्तक्षेप न करता स्वतःवर संयम बाळगणे आवश्यक आहे. तरच सत्तेचे खरे संतुलन टिकून राहील.

- ९५६१५९४३०६

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# अवैध बांधकामे व अग्निसुरक्षा उल्लंघनाविरुद्ध धोकादायक आस्थापनांवर गुरूवारपासून कारवाई



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर शहरातील अनधिकृत बांधकामे, अनधिकृत वापर व धोकादायक आस्थापनांविरुद्ध महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागांनी एकत्रितपणे, समन्वयाने व कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करावी. असे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी दिले त्यानुसार, शहरातील सर्व दहाही झोनमध्ये अवैध बांधकामे व अग्निसुरक्षा उल्लंघनाविरुद्ध धोकादायक आस्थापनांवर गुरूवार (ता. ११) पासून कारवाई करण्यात येणार आहे.

नागपूर शहरातील अनधिकृत बांधकामे, मंजूर बांधकाम नकाशाविना करण्यात आलेले बांधकाम, अनधिकृत वापरबदल, अग्निसुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आस्थापना तसेच अतिक्रमण याबाबत संबंधित विभागांच्या समन्वयाने प्रभावी कार्यवाही करण्यासाठी महापौर निता ठाकरे यांच्या अध्यक्षतेत आढावा बैठक घेण्यात आली. याप्रसंगी सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर स्थापत्य व बांधकाम विशेष समिती सभापती श्रीमती अश्विनी जिचकार, अग्निशमन व विद्युत विशेष समिती सभापती रूपाली ठाकूर, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त मंगेश खवले, नगररचना विभाग, संबंधित झोनचे सहायक आयुक्त, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, विभागीय अग्निशमन अधिकारी व सर्व केंद्र अधिकारी, अग्निशमन विभाग तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. त्यानुसार अवैध बांधकाम करणारे मॉल व व्यावसायिक संकुले, रुग्णालये व शोरूम, गोडाऊन आणि तात्पुरत्या स्वरूपाच्या शेड/पेंडाल संरचना, ट्युशन क्लासेस, बार व रेस्टॉरंट्स, अनधिकृत वापर सुरू असलेल्या इमारती आणि अग्निसुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आस्थापना यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.

यापूर्वी विविध विभागांतर्गत होणारी स्वतंत्र कारवाई टाळून आता सर्व संबंधित विभाग समन्वय साधून 'संयुक्त पथकाद्वारे' कारवाई करणार आहेत. यामध्ये अग्निशमन विभाग, संबंधित झोन कार्यालय, प्रवर्तन विभाग, उपद्रव शोध पथक आणि नगररचना विभाग, पोलीस प्रशासन एकत्रित येऊन धडक मोहीम राबवतील. नगररचना विभागाने प्रत्येक झोनमधील मंजूर बांधकाम परवानग्या व प्रत्यक्ष वापर यांची झोननिहाय अद्ययावत यादी उपलब्ध करून दिली असून, मंजूर नकाशाविरुद्ध प्रत्यक्ष वापर होत असल्यास तत्काळ कायदेशीर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

बैठकीत 'आशिष एनएक्स' या इमारतीमध्ये मंजूर वापराच्या विरुद्ध अनधिकृत वापर होत असल्याचे निदर्शनास आल्याने पूर्वपरवानगीशिवाय करण्यात आलेल्या या फेरफारावर थेट सीलिंगची कारवाई करण्यात आल्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. नियमबाह्य वापराविरुद्ध मनपा कोणत्याही प्रकारची तडजोड करणार नाही, असा स्पष्ट संदेश यामुळे दिला गेला आहे.

ही विशेष मोहीम १२ ऑगस्ट २०२६ ते ०८ सप्टेंबर २०२६ या एका महिन्याच्या कालावधीत प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. प्रत्येक झोनने निवडलेल्या १० प्रकरणांची सविस्तर माहिती जसे की आस्थापनेचे नाव, मालक, मंजूर व प्रत्यक्ष बांधकाम, अनधिकृततेचे स्वरूप, अग्निसुरक्षा स्थिती, पूवीर्ची व कारवाईदरम्यानची छायाचित्रे आणि केलेली नोटीस/सीलिंगची कारवाई याचा अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## ३०० नागरिकांचा पक्षप्रवेशाने काँग्रेस-राष्ट्रवादीला धक्का

### दवलामेटीत भाजपची ताकद वाढली, आमदार समीर मेघे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
दवलामेटी परिसरात भाजपने आपली राजकीय ताकद वाढवत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला धक्का दिला. हिंगणा विधानसभा क्षेत्राचे आमदार समीर मेघे यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. १०) झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्यात सुमारे २०० ते ३०० महिला-पुरुषांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

श्री शक्ती प्रतिष्ठान दुर्गामाता मंदिर परिसरात झालेल्या या सोहळ्यात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. रवींद्र खैरकर, अक्षय मोहिते, धनराज दिघोरे, पवन धारूकर, कुंवर राणा, किशोर कळसकर आणि मनीषा शिंगारे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या पक्षप्रवेशामुळे दवलामेटीत भाजपची संघटनात्मक ताकद वाढल्याचे चित्र निर्माण झाले.

आमदार समीर मेघे यांनी नवागतांचे पक्षाचा दुपट्टा व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी भाजप दवलामेटी शाखेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत सरपंच गजानन रामेकर होते. वाडी शहराध्यक्ष नरेश चरडे, खडगावचे सरपंच देवराव कडू, वाडीचे सभापती दिनेश कोचे, नगरसेवक कैलास मंथपुरवार, आनंद कदम, सोनू चरडे, माजी सरपंच नितीन अडसूळ, गोधणी मंडळ अध्यक्ष प्रमोद राऊत, दवलामेटी अध्यक्ष सुशील बावणे, गुरुदास बावणे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जलालखेडा बसस्थानकाचा होणार कायापालट, ५ कोटींचा निधी मंजूर

*आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या प्रयत्नांना यश; लवकरच नवीन बांधकामाला सुरुवात, प्रवासी, विद्यार्थी व महिलांना मिळणार अत्याधुनिक भौतिक सुविधा, अनेक वर्षांची गैरसोय दूर होणार*



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील जलालखेडा येथील बसस्थानकाचा लवकरच कायापालट होणार असून बसस्थानकाच्या नवीन बांधकामासह विविध भौतिक सुविधांसाठी तब्बल ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. काटोल विधानसभा मतदारसंघाचे आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून लवकरच प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या जलालखेडा बसस्थानकाला आता आधुनिक स्वरूप प्राप्त होणार आहे.

जलालखेडा हे काटोल-वरूड मार्गावरील महत्त्वाचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने या बसस्थानकाला मोठे महत्त्व आहे. परिसरातील जवळपास ६० ते ७० गावांमधील नागरिक, विद्यार्थी तसेच नोकरदार वर्ग दररोज काटोल, वरूड, अमरावती आणि नागपूरकडे जाण्यासाठी जलालखेडा बसस्थानकाचा वापर करतात. त्यामुळे येथे प्रवाशांची मोठी वर्दळ असते. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून बसस्थानकावर आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता.

बसस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने पावसाळ्यात चिखल व पाण्याचे साम्राज्य निर्माण होत होते. बसची वाट पाहणाऱ्या प्रवाशांना उभे राहण्यासाठीही योग्य व्यवस्था नव्हती. अनेक वेळा वाहनांच्या चाकांमुळे खड्ड्यातील चिखल प्रवाशांच्या अंगावर उडत असल्याने कपडे खराब होण्याच्या घटना घडत होत्या. याचा सर्वाधिक फटका शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बसत होता. चिखलामुळे कपडे खराब झाल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यातही अडचणी निर्माण होत होत्या.

त्याचबरोबर बसस्थानकावर स्वच्छतागृहाची पुरेशी सुविधा नसल्याने महिला प्रवाशांची विशेषतः मोठी गैरसोय होत होती. पिण्याचे पाणी, प्रवाशांसाठी बसण्याची व्यवस्था, स्वच्छता तसेच इतर मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी होती.

दरम्यान, जलालखेडा येथील युवक व ग्रामस्थांनी या समस्या आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तत्काळ दखल घेत बसस्थानक परिसरात डांबरीकरण करून दिले. मात्र, केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर न थांबता बसस्थानकाचा कायमस्वरूपी विकास व्हावा यासाठी आमदार ठाकूर यांनी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून बसस्थानकाच्या नवीन बांधकामासाठी तसेच आवश्यक भौतिक सुविधांसाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे आगामी काळात जलालखेडा बसस्थानकाला प्रशस्त, स्वच्छ आणि प्रवाशांसाठी अधिक सोयीस्कर स्वरूप मिळण्याची अपेक्षा आहे.

नवीन बसस्थानकामुळे प्रवाशांना निवारा, स्वच्छतागृह, बसण्याची व्यवस्था, स्वच्छ परिसर आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा फायदा होणार आहे. बसस्थानकाच्या विकासामुळे जलालखेडा हे परिसरातील प्रमुख वाहतूक केंद्र म्हणून अधिक सक्षम होण्याची शक्यता आहे.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या बसस्थानकाच्या प्रश्नाला आता कायमस्वरूपी तोडगा मिळणार असल्याने ग्रामस्थ व प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. पाच कोटींचा निधी मंजूर करून आणल्याबद्दल ग्रामस्थांनी आमदार चरणसिंग ठाकूर यांचे आभार मानले असून, कामाची लवकरात लवकर सुरुवात करून ते दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे.

## नागपूर जिल्ह्यात कृषी क्रांती! 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे' ५,१३४ शेतकऱ्यांना आता दिवसा वीज



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
ग्रामीण महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राला नवा आर्थिक आणि तांत्रिक बळकटपणा देण्यासाठी महावितरणच्या माध्यमातून राज्य शासनाने हाती घेतलेली 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' नागपूर जिल्ह्यात खऱ्या अर्थाने क्रांती घडवून आणत आहे. या अत्यंत महत्त्वाकांक्षी योजनेमुळे जिल्ह्यातील ५,१३४ शेतकऱ्यांना आता सिंचनासाठी रात्री-अपरात्रीच्या कष्टापासून मुक्त होत दिवसा अखंडित, खात्रीशीर आणि भरवशाचा वीज पुरवठा मिळू लागला आहे.

या योजनेचा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा पार पाडत, महावितरणच्या नागपूर ग्रामीण मंडलांतर्गत येणाऱ्या नरखेड तालुक्यातील ३३/११ केव्ही सावरगाव उपकेंद्रात नुकताच ८ मेगावॅट क्षमतेचा अत्याधुनिक सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वीरीत्या कार्यान्वित करण्यात आला आहे. या सावरगाव प्रकल्पापूर्वी नागपूर जिल्ह्यात कचारी सावंगा येथे ४ मेगावॅट क्षमता असलेला आणि तोंडाखैरी येथे ३ मेगावॅट क्षमता असलेला प्रकल्प यापूर्वीच यशस्वीपणे कार्यरत झाला होता. या तिन्ही प्रकल्पांच्या माध्यमातून आतापर्यंत नागपूर जिल्ह्यात एकूण १५ मेगावॅट वीज निर्मिती क्षमता प्रत्यक्षात उभी राहिली असून, यामुळे या संपूर्ण भागातील सुमारे ५ हजार १३४ शेतकऱ्यांच्या शेतीला दिवसा वीज मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

पारंपरिक पद्धतीने ग्रामीण भागात शेतकऱ्यांना सिंचनासाठी बहुतांश वेळा रात्रीच्या सुमारास वीज पुरवठा केला जात असे. यामुळे शेतकऱ्यांना रात्री-अपरात्री अंधारात शेतात जाणे, विषारी साप व विंचू दंश किंवा हिंस्त्र प्राण्यांच्या भितीखाली जीव मुठीत धरून काम करणे भाग पडत असे. याचा शेतकऱ्यांच्या शारीरिक आरोग्यावर आणि झोपेवर अत्यंत विपरीत परिणाम होत होता. मात्र, सावरगाव, कचारी सावंगा आणि तोंडाखैरी येथील सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या सर्व त्रासापासून कायमची मुक्ती मिळाली आहे. आता दिवसा लख्ख आणि नियमित वीज उपलब्ध होत असल्यामुळे शेतकरी अत्यंत सुखकरपणे आपल्या पिकांचे सिंचन करू शकत आहेत, तसेच खते व पाण्याचे योग्य नियोजन करणे त्यांना शक्य झाले आहे.

शासनाच्या या सर्वसमावेशक सौरऊर्जा धोरणामुळे ग्रामीण भागाच्या एकूणच आर्थिक व कृषी विकासाला मोठी गती मिळत आहे. शेतीसाठी मोठ्या प्रमाणात सौरऊर्जेचा वापर वाढल्यामुळे पारंपरिक ग्रीडवरील विजेचा ताण आपोआप कमी होत आहे आणि मोठ्या प्रमाणावर पर्यावरणपूरक हरित ऊर्जेची निर्मिती होत आहे. तसेच, स्थानिक पातळीवर सौर प्रकल्पांमधून वीज निर्मिती होत असल्यामुळे वीज पारेषण व वितरण दरम्यान होणारे तांत्रिक नुकसान मोठ्या प्रमाणावर कमी झाले असून, यामुळे संपूर्ण नागपूर ग्रामीण भागातील वीज पुरवठ्याची विश्वासार्हता आणि गुणवत्ता कैक पटींनी वाढली आहे.

शेतकऱ्यांच्या जीवनात शाश्वत क्रांती घडवून आणण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी संकल्पनेतून आकाराला आलेली 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' आज ग्रामीण महाराष्ट्रासाठी वरदान ठरत आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून दिल्यामुळे पिकांचे ऐन वेळेवर होणारे नुकसान टळणार आहे आणि शेतकरी आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होणार आहेत. महावितरणकडून अशा प्रकारच्या नाविन्यपूर्ण सौर ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीवर सध्या युद्धपातळीवर भर दिला जात आहे, ज्यामुळे ग्रामीण भागातील शाश्वत ऊर्जा गरजा सहजतेने पूर्ण होत आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार आगामी मार्च २०२७ च्या अखेरपर्यंत राज्यातील कृषी सिंचनासाठी लागणारा शंभर टक्के वीज पुरवठा केवळ आणि केवळ सौरऊर्जेद्वारेच उपलब्ध करून देण्याचे एक अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि ऐतिहासिक नियोजन राज्य शासनाने केले आहे. या संपूर्ण मोहिमेला आणि राज्य सरकारच्या धोरणाला ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचे बहुमूल्य मार्गदर्शन व सततचे प्रोत्साहन लाभले आहे.

याच पार्श्वभूमीवर, महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक, नागपूर ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे आणि नागपूर शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे नेतृत्वाखाली नागपूर जिल्ह्यात विविध ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीची कामे अत्यंत वेगाने आणि निर्धारित वेळेत प्रगतीपथावर आहेत.

थोडक्यात

## पोरवाल महाविद्यालयात 'हर घर तिरंगा' रॅली



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**
स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी सेठ केसरिमल पोरवाल महाविद्यालय, कामठी येथे 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. स्वप्नील दहाट यांच्या मार्गदर्शनाखाली रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य श्री. व्ही. बी. वंजारी तसेच पर्यवेक्षक श्री. एन. डी. मेंढे यांची प्रमुख उपस्थिती होती. रॅलीदरम्यान राष्ट्रीय ध्वज हातात घेऊन देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. 'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि तिरंग्याबद्दल आदराची भावना निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. रॅलीची सांगता ही राष्ट्रगीताने झाली. या रॅलीमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. रॅलीमुळे संपूर्ण परिसरात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले.

## जागतिक आदिवासी दिनानिमित्त कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर

### फुले-शाहू-आंबेडकर, बिरसा मुंडा व कांशीराम यांच्या विचारांचा जागर



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
जागतिक आदिवासी दिनानिमित्त पोलीस नगर, हिंगणा रोड येथे रविवारी (दि. ९) एकदिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर (कॅडर कॅम्प) उत्साहात पार पडले. शिबिरात बहुजनवादी महापुरुषांचा इतिहास, संघर्ष आणि वर्तमान परिस्थिती याबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बिरसा मुंडा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बहुजन नायक कांशीराम यांच्या प्रतिमांना रामटेक लोकसभा प्रभारी राजकुमार बोरकर, कॅडर टीचर युवराज जगणे, प्रभारी सुरेश मानवटकर, सुधाकर सोनपिंपळे व विधानसभा अध्यक्ष सुरेंद्र शेंडे यांनी अभिवादन केले. शिबिराचे उद्घाटन करताना राजकुमार बोरकर यांनी फुले, शाहू, बिरसा मुंडा, डॉ. आंबेडकर व कांशीराम यांच्या त्याग व संघषार्चा इतिहास कॅडरच्या माध्यमातून बहुजन समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. कॅडर टीचर युवराज जगणे यांनी कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिले.

यावेळी ज्येष्ठ पदाधिकारी धनराज गजभिये, विकास गोपनारायण व सुनील थूल यांचा सत्कार करण्यात आला. शिबिराला महिला व पुरुष कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुधाकर सोनपिंपळे, सुरेश मानवटकर, सुरेंद्र शेंडे, रत्नाकर वाळके, श्रावण गोसावी, विजय पाल आवडे, राजू कोलते, सुरेंद्र मोरे, सविता मेश्राम आदींनी परिश्रम घेतले. संचालन सुरेंद्र शेंडे यांनी केले, तर आभार श्रावण गोसावी यांनी मानले.

## कवडसजवळ मध्यरात्री ट्रक पलटी, सुदैवाने जीवितहानी नाही

### सावनेर पोलिसांसह हितज्योती आधार फाउंडेशनची घटनास्थळी धाव



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**
पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत येणाऱ्या कवडसजवळ रात्री सुमारे १.३० वाजता ट्रक क्रमांक RJ 50 GB 0603 राजस्थान वरून नागपूर कडे जात होता आणि पलटी झाल्याची घटना घडली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी किंवा जखमी झाल्याची माहिती नाही. घटनेची माहिती रोहित कश्यप यांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना दिली. माहिती मिळताच हितज्योती आधार फाउंडेशनची टीम तात्काळ घटनास्थळी रवाना झाली. तसेच सावनेर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक ऋतुजा जाधव यांना घटनेची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच सावनेर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. ट्रक पलटी झाल्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती. सावनेर पोलिसांनी तात्काळ वाहतूक सुरळीत केली.

यावेळी पीएसआय उमेश मेश्राम, रोशन काळे, अमित उमाटे, संजय शेंद्रे, हेमराज मुळे यांच्यासह हितज्योती आधार फाउंडेशन टीमचे रोहित कश्यप, हितेश बनसोड,शिवा मोरे,शुभम लोधी आदींनी घटनास्थळी मदतकार्य केले. मध्यरात्रीची वेळ असूनही पोलिसांनी आणि हितज्योती आधार फाउंडेशनच्या टीमने दाखवलेल्या तत्परतेमुळे परिस्थिती लवकर नियंत्रणात आणण्यात आली.

## तुकाराम मुंढेंचा मोर्चा बस स्थानकांकडे

**संभाजीनगर :** राज्यात एफडीएच्या धडक कारवाया सुरूच असून तुकाराम मुंढेंच्या आदेशाने अन्न व औषध प्रशासन विभागाने आता आपला मोर्चा राज्यातील बस स्थानकांवर असलेल्या कँटीनकडे वळवल्याचे दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वीच तुकाराम मुंढेंनी आपला मोर्चा आता चायनीज स्टॉलकडे वळवण्यात येईल, असे संकेत दिले होते. त्यानंतर, आता छत्रपती संभाजीनगरच्या सिल्लोड एसटी बस डेपोतील कॅन्टीनवर अन्न आणि औषध प्रशासनाने धडक कारवाई केली आहे. त्यानुसार येथील कँटीनचा परवाना रद्द करत हॉटेल सील करण्यात आलं आहे. ह्यसेफ फूड, सेफ महाराष्ट्रह्ण मोहिमेअंतर्गत केलेल्या तपासणीत कॅन्टीनमध्ये अस्वच्छता, अन्न सुरक्षेच्या नियमांचं उल्लंघन आणि आवश्यक नोंदींचा अभाव आढळून आला.

# 'महाज्योती'चे ११ शिलेदार यूपीएससी निकालात झाले असिस्टंड कमांडेंट

## केंद्रीय सशस्त्र पोलिस दल परीक्षेत विद्यार्थ्यांची बाजी



ऋषीप्रसाद सुहास देवरे (२० रँक) | इंद्रजित महेश खाडे (३० रँक) | प्रणित सुधाकर फटंगरे (३६ रँक) | विनायक अजय नागरिया (४० रँक) | प्रतिक गणेश जेव्हारे (५७ रँक)



पल्लवी बाळासाहेब अहेर (९५ रँक) | प्रज्वल राजकुमार शिंदे (९७ रँक) | विश्वास अजयकुमार झरगाड (१४५ रँक) | गौरव गुरुनाथ म्हात्रे (१७२ रँक) | सुदर्शन नारायण नेहारकर (२३९ रँक) | पांडुरंग बाबुराव फोंडे (२५२ रँक)

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रशासकीय सेवांच्या क्षेत्रात महाज्योतीने आणखी एक दमदार कामगिरी नोंदवत आपल्या यशाची घोडदौड कायम ठेवली आहे. महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (महाज्योती) ने राष्ट्रीय स्तरावरील प्रशासकीय सेवांच्या क्षेत्रात आपल्या यशाची मोहोर उमटवली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (सहाय्यक कमांडंट) परीक्षा २०२५च्या ३५० पदांसाठी घेण्यात आलेल्या मुख्य परीक्षेच्या अंतिम निकालात महाज्योतीच्या प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेतलेल्या ११ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत असिस्टंट कमांडेंटपदाला गवसणी घातली आहे. त्यामुळे गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशासकीय सेवेत संधी देत अधिकारी घडविणारी अग्रगण्य संस्था म्हणून महाज्योतीने आपला ठसा अधिक भक्कम केला आहे.

राज्यातील बहुजन समाजातील, विशेषतः ग्रामीण आणि सर्वसामान्य कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (सहाय्यक कमांडंट) सारख्या सर्वोच्च पदांपर्यंत पोहोचवण्यासाठी महाज्योती केंद्रबिंदू ठरत आहे. केंद्रीय सशस्त्र पोलिस दल परीक्षेच्या अंतिम निवड यादीत ऋषीप्रसाद सुहास देवरे (२० रँक), इंद्रजित महेश खाडे (३० रँक), प्रणित सुधाकर फटंगरे (३६ रँक), विनायक अजय नागरिया (४० रँक), प्रतिक गणेश जेव्हारे (५७ रँक), पल्लवी बाळासाहेब अहेर (९५ रँक), प्रज्वल राजकुमार शिंदे (९७ रँक), विश्वास अजयकुमार झरगाड (१४५ रँक), गौरव गुरुनाथ म्हात्रे (१७२ रँक), सुदर्शन नारायण नेहारकर (२३९ रँक) आणि पांडुरंग बाबुराव फोंडे (२५२ रँक) या ११ गुणवंतांनी स्थान मिळवले आहे. हे सर्व विद्यार्थी आता केंद्रीय सशस्त्र पोलिस दलात असिस्टंट कमांडेंट अधिकारी म्हणून रुजू होणार आहेत, अशी माहिती महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांचे कठोर परिश्रम आणि संस्थेच्या पारदर्शक प्रशिक्षण प्रणालीला दिले आहे. संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी तसेच मुलाखतीसाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले होते. याशिवाय अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, सराव मुलाखती आणि अद्ययावत अभ्यास साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आवश्यक तयारी करून देण्यात आली. या सर्व प्रयत्नांच्या बळावर विद्यार्थ्यांनी हे उल्लेखनीय यश संपादन केले. यूपीएससीच्या निकालात महाज्योतीच्या माध्यमातून यशस्वी बहुजन विद्यार्थ्यांची कामगिरी ही सामाजिक परिवर्तनाच्या वाटचालीतील एक मोठी क्रांती असल्याचे मिलिंद नारिंगे यांनी नमूद केले.

### महाज्योतीच्या यशाचा आलेख उंचावतच राहणार : अतुल सावे



यूपीएससीच्या केंद्रीय सशस्त्र पोलिस दल परीक्षेत महाज्योतीच्या ११ विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश ही महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे मत राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री तसेच महाज्योतीचे अध्यक्ष अतुल सावे यांनी व्यक्त केले आहे. ग्रामीण आणि बहुजन समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना योग्य प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि संधी मिळाल्यास ते राष्ट्रीय स्तरावर आपले कर्तृत्व सिद्ध करू शकतात, हे या यशाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. महाज्योतीच्या माध्यमातून प्रशासकीय सेवेत बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व वाढत असून, ही सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने महत्त्वाची वाटचाल आहे. केंद्रीय सशस्त्र पोलिस दलात ११ विद्यार्थ्यांची सहाय्यक कमांडेंटपदी झालेली निवड ही महाज्योतीच्या कार्याला मिळालेली मोठी पावती आहे. गुणवंतांना संधी देत अधिकारी घडविण्याची महाज्योतीची ही यशाची घोडदौड यापुढेही अशीच सुरू राहील, असा विश्वासही अतुल सावे यांनी व्यक्त केला आहे.

## थोडक्यात

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत पहिल्या टप्यात पारशिवनी तालुक्यातील ७१२ शेतकऱ्यांना लाभ

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे वतीने तालुक्यातील २०७६ शेतकरी या कर्जमुक्तीकरीता पात्र ठरले असुन त्यापैकी पहिल्या टप्यात ७१२ शेतकरयांना या योजनेच्या लाभ मिळाला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंमलबजावणीचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार पारशिवनी तालुक्यातील सर्व बँकांमधील २०७६ पात्र शेतकऱ्यांची यादी पोर्टलवर अपलोड करण्यात आली. व त्यामधील पहिल्या टप्प्याअंतर्गत शासनाने सदर कर्जमुक्ती योजनेतील पारशिवनी तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांपैकी ७१२ लाभार्थ्यांची पहिली यादी दिनांक २४/७/२६ रोजी प्रसिध्द केली आहे.

पारशिवनी तालुक्यातील सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपल्या नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रावर तात्काळ जाऊन आधार प्रमाणीकरण करुन घेण्यात यावे. सदर आधार प्रमाणीकरणासाठी संबंधीत शेतकऱ्याकडे अँग्रीस्टॅक क्रमांक असणे गरजेचे आहे. पात्र लाभार्थ्यांपैकी फार्मर आयडी/अँग्रीस्टॅक क्रमांक नसलेल्या शेतकऱ्यांनी तात्काळ नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रातून फार्मर आयडी/अँग्रीस्टॅक क्रमांकासाठी ऑनलाईन अर्ज करुन आपला फार्मर आयडी/अँग्रीस्टॅक क्रमांक प्राप्त करुन घ्यावा व त्यानंतर आधार प्रमाणीकरण करुन घ्यावे. पात्र लाभार्थ्यांच्या कर्जमाफी यादीतील व पोर्टलवरील रकमेत तफावत आढळून आल्यास पोर्टलवरील रक्कम गृहीत धरुन शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करावे. पात्र लाभार्थ्यांपैकी मयत शेतकऱ्यांच्या वारसाने अथवा इतर पात्र लाभार्थ्यांना येणाऱ्या कोणत्याही अडचणीसाठी तात्काळ सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका पारशिवनी, यांचेशी संपर्क करावा असे, असे आवाहन पारशिवनी तालुका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### निमखेडा ग्रामपंचायतीचा 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' उपक्रमा अंतर्गत भव्य वृक्षारोपण संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र उपक्रमाचे औचित्य साधून निमखेडा ग्रामपंचायतीने गावात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत एक भव्य वृक्षारोपण उपक्रम यशस्वीरित्या राबविला. ग्रामपंचायत ने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमांतर्गत वनविभागाचा १८ एकर पळीत जागेत ६००० हजारा हून अधिक रोपे लावण्यात आली. यामध्ये मुख्यतः आंबा, पेरू, चिकू, सिताफळ, लिंबू, आणि बांबू, अशा देशी प्रजातीच्या रोपांचा समावेश होता. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि गावाला हिरवीगार ओळख देण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला, अशी माहिती प्रशासक सौ. कलावती सुभाष तडस यांनी दिली. यावेळी बोलताना, पंचायत समिती पारशिवनी चे गट विकास अधिकारी सुभाष जाधव यांनी सांगितले की, "केवळ रोपे लावून थांबायचे नाही, तर ती जगवणे हे ग्रामपंचायतीचे आणि प्रत्येक ग्रामस्थाचे कर्तव्य आहे. प्रत्येक रोपाचे संगोपन करण्याची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, पुढील काळात सुद्धा या रोपांची नियमित काळजी घेतली जाईल."

या कार्यक्रमाला जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त जि.प. नागपूर डॉ. नितीन फुके यांनी शेती विषयक पूरक व्यवसाय म्हणुन वृक्षलागवड, जनावरांचा चारा, कुकुटपालन, दुधजण्य पदार्थांचा उद्योग उभारून आपले जिवनमान सुधारण्याबाबत चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले. या उपक्रमा अंतर्गत गावातील ४० ते ५० मजुरांना कायमस्वरूपी रोजगार मिळण्याची संधी प्राप्त झाली. या कार्यक्रमाला विस्तार अधिकारी ठाकूर, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी नितेश हारोडे, तांत्रिक सहाय्यक (कृषी) दिनेश कामडी, कृषी उत्पन्न बाजार समिती (उपाध्यक्ष) सुभाष तडस, ग्रा.पं.प्रशासक सदस्य देवा डोंगरे व इतर प्रशासकीय सदस्य तसेच सी.आर.पी., आशा सेविका, बँक सखी, पशु सखी,सह मोठ्या संख्येने गावकरी नागरिक या कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना पर्यावरणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता ग्रा.पं. अधिकारी राजकुमार बागडे, ग्रा.प. कर्मचारी, रोजगार सेवक संगणक परिचालक यांनी मोलाची कामगिरी केली. निमखेडा ग्रामपंचायतीचा हा स्तुत्य उपक्रम निश्चितच इतर ग्रामपंचायतींना प्रेरणा देणारा ठरेल, यात शंका नाही.

### सावनेर ते तेलंगखेडी (नवनाथ) बस सेवा सुरू



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर तालुक्यात असलेल्या तेलंगखेडी (नवनाथ) येथे एसटी महामंडळाची बस नुकतीच सुरू करण्यात आली, त्यामुळे गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला. तेलंग खेडी येथील नवनाथ आश्रम प्रसिद्ध आहे या आश्रमात दररोज भाविक मोठ्या संख्येने येतात. तसेच गावातील विद्यार्थी सावनेर येथे शिकण्याकरता जात असतात. त्यादृष्टीने ही बस अतिशय सोयीची झालेली आहे. सावनेर, सावनगी, तेलकामठी, तेलगाव या मार्गाने दिवसातून दोन वेळा ही बस येत असल्याने विद्यार्थी आणि नाथ भक्तांना सोयीची झालेली ही बस सेवा सुरू झाल्याबद्दल गावातील गावात नागरिक प्रवीण गिरडे, बलदेव घोटेकर, चंद्रशेखर झाडे, विलास देशमुख, नवनाथ आश्रमाचे व्यवस्थापक वामन झोटिंग, अशोक हिवरकर, विजय घोटेकर, प्रशांत देशमुख, शंकर झुटी, पुरुषोत्तम खेकडे व गावातील नागरिकांनी एसटी महामंडळाचे आभार व्यक्त केले आहे.

# २६ वर्षांची भक्तीची अखंड ज्योत! संत भाकरे महाराजांच्या नामघोषाने दुमदुमली मेंढला नगरी

### सात दिवसांचा सप्ताह उत्साहात संपन्न; हरिपाठ, भजन, दिंडी-पालखी अन् महाप्रसादाने भक्तिमय वातावरण

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील मेंढला येथे श्री संत भाकरे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित सात दिवसीय सप्ताहाची आज सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. २ ऑगस्टपासून सुरू झालेल्या या सप्ताहात दररोज सायंकाळी हरिपाठ, विविध भजन मंडळांचे भजन, अभंग व हरिनामाचा जागर करण्यात आला. त्यामुळे तब्बल आठ दिवस मेंढला नगरी संतवाणी आणि हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेली होती.

श्री संत भाकरे महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्याला यंदा २६ वर्षे पूर्ण झाली असून, गेल्या २६ वर्षांपासून ही धार्मिक परंपरा अखंडपणे सुरू आहे. काळ बदलला, पिढ्या बदलल्या; मात्र संत भाकरे महाराजांच्या पुण्यतिथीची श्रद्धा आणि ग्रामस्थांची भक्ती आजही कायम असल्याचे या सोहळ्यातून दिसून आले.



सप्ताहाच्या प्रत्येक दिवशी सायंकाळी हरिपाठाचे आयोजन करण्यात आले. दररोज वेगवेगळ्या भजन मंडळांनी सहभाग घेत भजन, अभंग आणि संतवाणीच्या माध्यमातून उपस्थित भाविकांना अध्यात्मिक संदेश दिला. टाळ-मृदंगाच्या गजरात हरिनामाचा जयघोष होत असल्याने संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. महिला, पुरुष, युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांनीही या धार्मिक कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

पुण्यतिथीच्या दिवशी सकाळपासूनच गावात धार्मिक उत्साह पाहायला मिळाला. ग्रामस्थांनी एकत्र येत गावाची स्वच्छता केली. त्यानंतर विधिवत पूजापाठ करून श्री संत भाकरे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भाविकांनी दर्शन घेतले आणि गावाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

यानंतर दिंडी व पालखी सोहळा काढण्यात आला. भजन मंडळांच्या सहभागाने टाळ-मृदंगाच्या गजरात श्री संत भाकरे महाराजांची पालखी संपूर्ण गावातून मिरविण्यात आली. पालखी मार्गावर ग्रामस्थांनी दर्शन घेतले. ठिकठिकाणी पालखीचे स्वागत करण्यात आले. श्री संत भाकरे महाराजांचा जयजयकार आणि हरिनामाच्या गजराने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

या सप्ताहाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दररोज वेगवेगळ्या भजन मंडळांनी दिलेली भक्तीमय सेवा. त्यामुळे सप्ताहाच्या प्रत्येक दिवशी नवीन भजन मंडळाचे सादरीकरण ऐकण्याची संधी भाविकांना मिळाली. संतांच्या विचारांचा प्रसार, अध्यात्मिक संस्कार आणि गावातील सामाजिक एकोपा मजबूत करण्यासाठी अशा धार्मिक उपक्रमांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. सप्ताहाच्या सांगतेनिमित्त आज सोमवारी विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. मेंढला तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला.

गेल्या २६ वर्षांपासून सुरू असलेली श्री संत भाकरे महाराजांची पुण्यतिथीची परंपरा ही मेंढला गावाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. भक्ती, संतविचार, स्वच्छता आणि सामाजिक एकोप्याचा संदेश देत २ ऑगस्टपासून सुरू झालेल्या सप्ताहाची आज १० ऑगस्ट रोजी उत्साहात सांगता झाली. पुढील पिढीलाही ही संतपरंपरा आणि भक्तीची ज्योत अखंडपणे पुढे नेण्याचा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला.

### खात येथे 'हर घर तिरंगा' अभियानाच्या निमित्ताने माजी भाजपा तालुकाध्यक्ष मुकेश अग्रवाल यांनी स्वगृही व प्रतिष्ठान येथे फडकविला तिरंगा



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

तिरंगा हा केवळ आपल्या देशाची ओळख नाही, तर तो आपल्या स्वातंत्र्याचा, शौर्याचा आणि राष्ट्राभिमानाचा प्रतीक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत व्यवसायाच्या ठिकाणी असो किंवा आपल्या घराच्या अंगणात, प्रत्येक ठिकाणी राष्ट्राभिमानाची भावना जपण्याच्या हेतूने खात येथे हर घर तिरंगा अभियानांतर्गत माजी भाजपा तालुकाध्यक्ष मुकेश अग्रवाल यांनी सपत्नीक स्वगृही व त्यांचे प्रतिष्ठान गोपाल ट्रेडर्स येथे आज मंगळवार ( ता. ११ ऑगस्ट) ला राष्ट्रध्वज तिरंगा अभिमानाने फडकविला. यावेळी हर घर तिरंगा..... हर मन तिरंगा अशा घोषणाही देण्यात आल्या. यावेळी भाजपा मौदा तालुक्याचे माजी अध्यक्ष मुकेश अग्रवाल, नागपूर जिल्हा परिषदेच्या माजी जिल्हा परिषद सदस्या राधा मुकेश अग्रवाल, खातचे माजी सरपंच कैलास वैद्य, खातचे उपसरपंच रवींद्र मांडरकर, ग्रामपंचायत सदस्य अरविंद तांबुलकर, नाना राखडे, कुणाल पंचबुद्धे, प्रफुल्ल इरपाते, अश्विन गुरुभेले, सूरज वैद्य, सूरज देवगडे उपस्थित होते.

हर घर तिरंगा अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक घरात आणि प्रत्येक मनात राष्ट्रभक्तीची भावना अधिक दृढ होत असल्याने खात - रेवराल जिल्हा परिषद सर्कल व मौदा तालुक्यातील प्रत्येक नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे असे आव्हान माजी भाजपा तालुकाध्यक्ष मुकेश अग्रवाल व माजी जिल्हा परिषद सदस्या राधा अग्रवाल यांनी केले आहे.

# संकटाच्या काळात रिअल इस्टेट परिवार ठामपणे उभा राहिला!

### भारतीय रिअल इस्टेट सल्लागार/एजंट वेल्फेअर युनियनची मानवतेची प्रेरणादायी गाथा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारतीय रिअल इस्टेट सल्लागार / एजंट वेल्फेअर युनियनने संघटना केवळ व्यावसायिक हितासाठी कार्यरत नसून सदस्यांच्या सुख- दुःखात कुटुंबाप्रमाणे खंबीरपणे साथ देणारी सामाजिक संघटना असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. युनियनच्या अकोला जिल्हा कार्यकारिणीचे कोषाध्यक्ष स्व.वीरेश ढोके यांचे काही दिवसांपूर्वी अचानक हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या अकाली निधनामुळे पत्नी, लहान मुलगी आणि वृद्ध वडिलांवर दुःखाचा डोंगर कोसळला.



कुटुंबातील एकमेव कमावती व्यक्ती अचानक गमावल्याने परिवारासमोर गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले. या कठीण प्रसंगी भारतीय रिअल इस्टेट सल्लागार/एजंट वेल्फेअर युनियनच्या राष्ट्रीय टीम (नागपूर) ने संवेदनशीलता दाखवत अकोला जिल्हा व अकोला पूर्व झोनच्या पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने स्व. वीरेश ढोके यांच्या परिवाराला ५१ हजारांची आर्थिक मदत दिली. ही मदत केवळ आर्थिक सहाय्य न ठरता संपूर्ण रिअल इस्टेट परिवाराच्या आपुलकीची, सामाजिक बांधिलकीची आणि एकजुटीची जिवंत साक्ष ठरली. युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष राजवीर सिंह यांच्या हस्ते ही आर्थिक मदत ढोके परिवाराकडे सुपूर्द करण्यात आली.

या उपक्रमासाठी नागपूर राष्ट्रीय टीमने घेतलेला पुढाकार, पदाधिकाऱ्यांमधील उत्कृष्ट समन्वय आणि मानवी मूल्यांप्रती असलेली बांधिलकी विशेष कौतुकास्पद ठरली. या प्रसंगातून संकटाच्या काळात कोणताही सदस्य किंवा त्याचे कुटुंबीय एकटे नसल्याचा विश्वास युनियनने कृतीतून दिला. संघटित नेतृत्व आणि परस्पर सहकार्याची ताकद या उपक्रमातून अधोरेखित झाली.

यावेळी अकोला जिल्हाध्यक्ष आतिष तायडे, कार्यकारी अध्यक्ष निलेश देशपांडे, उपाध्यक्ष अजय गवळी, उपाध्यक्ष श्याम डोंगरे, सचिव विठ्ठल चिंतामणी, पीआरओ शिवाजी गावंडे, मीडिया प्रमुख पवन वानखडे, अजय वांडेकर, सहसचिव व कोषाध्यक्ष आशिष देवकते, अकोला पूर्व झोन अध्यक्ष गोपाल कोगदे, सचिव दीपक पाटील, महेश राहुडकर, एकनाथ वानखडे, गणेश चिंचोलकर यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

याप्रसंगी युनियनच्या वतीने रिअल इस्टेट क्षेत्रातील प्रत्येक सल्लागार आणि एजंटने केवळ व्यावसायिक नाते न ठेवता एक कुटुंब म्हणून परस्परांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन करण्यात आले. एखाद्या सदस्यावर संकट ओढवले तर संपूर्ण रिअल इस्टेट समाजाने त्याच्या मदतीसाठी धावून जाणे, हीच सक्षम, सुसंघटित आणि संवेदनशील समाजाची खरी ओळख असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. 'संघटनेची खरी ताकद सदस्यसंख्येत नसून परस्परांप्रती असलेल्या विश्वास, जबाबदारी आणि सहकार्याच्या भावनेत असते,' असा संदेश भारतीय रिअल इस्टेट सल्लागार/एजंट वेल्फेअर युनियनने दिला.

अकोला येथे राबविण्यात आलेला हा मानवतावादी उपक्रम संपूर्ण रिअल इस्टेट क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरला असून एकजूट असेल तर कोणतेही संकट मोठे नसते, हा संदेश या माध्यमातून प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचला आहे.

# भक्तांचा भाव आणि भगवंताची धाव

देवशयनी आषाढी एकादशीच्या पर्वावर आषाढी वारीचा सोहळा पंढरपुराच्या वाळवंटात संपन्न झाला. राज्याच्या नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यातून आषाढी वारीत हजारो दिंड्या विठुरायाच्या दर्शनासाठी दाखल होतात. यंदा तर सातासमुद्रापार इंग्लंडमधून पंढरपुरात विठ्ठल भक्तांची मांदियाळी पालखीसह दाखल झाली होती. पंढरीच्या वारीचा महिमा मोठा विलक्षण आहे.आता अनेक दिंड्या परतीचा वाटेवर निघाल्या आहेत. तर काहींची परतवारी पूर्ण सुद्धा झालेली आहे.

शशिकांत तोटे
जि. यवतमाळ
मो. ९१३०८३५४५८

भगवंताला भक्ताच्या भेटीची ओढ कायम असते यात शंका नाही. देवभक्ताचं अतूट नातं जन्मोजन्मीचे असते. भगवंताच्या भक्तीने केवळ स्वतःचा उद्धार होत नाही,तर भक्तांच्या कुळाचा उद्धार सुद्धा होत असतो.भगवंत भक्तांच्या नातेसंबंधात आपल्या संतांची थोरवी फार मोठी आहे.याच थोर भक्तीपरंपरेतील संत सावता माळी होय. विठ्ठलाच्या नामस्मरणात आपल्या शेतमळ्यात कार्यमग्न राहून, विठ्ठलभक्ती करणारे संत सावता महाराज सर्वांचे सुप्रचित आहे.

" कांदा मुळा भाजी'
अवघी विठाई माझी
लसूण मिरची कोथिंबीर'
अवघा झाला माझा हरी
ऊस गाजर रताळू'
अवघा झालासे गोपाळू
मोट नाडा विहीर दोरी'
अवघी व्यापिली पंढरी
सावता म्हणे केला मळा'
विठ्ठल पायी गोविला गळा"

अशा शब्दात सावतामाळी रचना करून आपल्या मळ्यात प्राणप्रिय विठाईला शोधतात. मळ्यातील लसूण, मिरची, कोथिंबीरीला आपला हरी म्हणतात. तर ऊस, गाजर, रताळूला गोपाळु मानतात आणि याच मळ्यातील मोट, नाडा, विहीर, दोरीच्या रूपाने आपल्या मळ्याला पंढरी सारखे व्यापून टाकल्याची अनुभूती येते.मग पंढरीच्या वारीला जाण्याचे प्रयोजन उरतच नसे. खरंतर, सावता माळी पंढरीची वारी कधीच करत नसे. परंतु आपल्या अरण गावावरून जाणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला माझा निरोप विठुराया पर्यंत पोहोचवा असे म्हणायचे.



भक्ताला भगवंताच्या भेटीची ओढ असावी परंतु, सावता महाराजांच्या बाबतीत उलट घडते. पंढरीचे सावळे परब्रम्ह सावतांच्या मळ्यात सावता सोबत राबतात. केवढा हा भक्ताप्रति देवाचा प्रेमभाव. भक्तांचा श्रेष्ठ अधिकार एवढा की,चक्क देव भक्तांच्या भेटीला जातो. या भक्तीपरंपरचे अनोखे दर्शन सुमारे पाच शतकांपासून आजही बघायला मिळते. होय! आपला लाडका भक्त संत सावता माळ्याच्या भेटीसाठी पांडुरंगाची पालखी श्रीक्षेत्र अरण गावात मार्गस्थ होते. विठ्ठल- रुक्मिणीच्या महाद्वारातून, शेकडो वारकऱ्या समावेत "ज्ञानोबा- तुकाराम, पुंडलिक वरदा हरी विठ्ठल" च्या गजरात विठुरायाच्या पादुका पालखी समावेत अरणच्या दिशेने मार्गस्थ होतात. आषाढी वारीनंतर पांडुरंग परमात्मा स्वतःआपल्या भक्तांच्या भेटीसाठी निघतात.ही पंढरीच्या विठ्ठलभक्ती परंपरेतील अत्यंत भावस्पर्शी परंपरा मानली जाते.

ज्याप्रमाणे भक्त पुंडलिकाचा सेवाभाव पाहून श्रीहरी विष्णू वैकुंठ सोडून थेट पंढरपुरात आले. त्याचप्रमाणे, भक्ती आणि कर्मयोगाचा संयोग सावता माळ्यांच्या बाबतीत झालेला दिसतो. पंढरपूर ते अरण या मार्गावर मजल-दरमजल करत विठुरायाची पालखी सावत्या माळ्यांच्या अरण गावी पोहोचते. संत सावता माळ्यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानंतर, विठुरायाच्या पालखीच्या परतीचा प्रवास सुरू होतो. भक्तांच्या भेटीसाठी साक्षात भगवंत निघाल्याचे हे अनोखे विलक्षण भक्तीपर्व पाहण्यासाठी हजारो भाविक अरण मध्ये दाखल होतात.

"धन्य ते अरण,रत्नाचीच खाण,
जन्मला निधान सावता तो"

अशा शब्दात संत नामदेवांनी सावता माळ्यांचा गौरव केला आहे.

# युवा वर्गापुढे शिक्षण प्रणाली, बेरोजगारी, भ्रष्टाचार व पर्यावरणासह अनेक आव्हानांना कडवी झुंज देण्याची वेळ!

आज देशातील युवा पिढीपुढ (जेन-झी)अनेक आव्हाने उभे आहेत देशातील पेपर फुटी,अन्नपदार्थांमध्ये भेसळ, भ्रष्टाचार, महागडे शिक्षण, बेरोजगारी, महागाई, पर्यावरण इत्यादीसह अनेक कठीणायीचा सामना आजच्या युवा वगार्ला करावा लागणार आहे.जगामध्ये युवा पिढीच्या वाढत्या समस्या पहाता जेन-झीने आक्रमक रूप धारण केले आहे आणि याचे देशासह संपूर्ण जगात आपल्याला पडसाद पहायला मिळत आहे. सध्याच्या परिस्थितीत जगातील संपूर्ण युवकांनी घातक क्षेपणास्त्रे, जैविक हतीयार, प्लास्टिकचा अती वापर, युद्धजन्य परिस्थिती, वाढते धुम्रपान व वाढते प्रदुषण याचा कडाडून विरोध करण्याची वेळ आली आहे. संयुक्त राष्ट्र संघाने १७ डिसेंबर १९९९ ला युवा विश्व संम्मेलनाच्या कार्यक्रमात ठरविण्यात आले की प्रत्येक वर्षाच्या "१२ ऑगस्टला" युवा दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली.याप्रमाने पहिल्यांदाच २००० मध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिवसांची सुरूवात करण्यात आली.

आंतरराष्ट्रीय युवा दिवस

रमेश लांजेवार
नागपूर

२०१८ मध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिवसांचा थीम होता "युवाओं के लिये सुरक्षित स्थान" आणि २०१९ मध्ये थीम होता "ट्रांस्फोर्मिंग एज्युकेशन" परंतु २०२६चा थीम "पृथ्वी को बचाने का प्रयास". हा थीम असायला पाहिजे असे माझे मत आहे. कारण वैश्विक महामारी आणि पृथ्वीचा होत असलेला ह्रास याला युवा शक्तीच वाचवु शकते. संपूर्ण जगाची धुरा युवकांच्या हाती आहे.कारण आजच्या परिस्थितीत पृथ्वीतलावर "जगात युध्दजन्य परीस्थितीत दिसून येते. आज प्रत्येक देश एकमेकावर वरचढ होण्याचा प्रयत्न करीत आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेले युक्रेन-रशिया युद्ध, अमेरिका-इजरायल-हमास-इरान युद्ध व तैवान-चीन कटुता यात प्रगती तर नाहीच परंतु विनाश अटळ आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शि.जिंपिंग यांनी वुहानमध्ये कोरोणा व्हायरस तयार केला आणि याला संपूर्ण जगात पसरविण्याचे काम सुध्दा चीनने केले. यात लाखोंच्या संख्येने जिवीत हानी सुध्दा झाली व करोडोंच्या संख्येने संक्रमीत झाले होते. अमेरीकेने दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी ६ ऑगस्ट १९४५ साली सकाळी ८ वाजुन १५ मि. हिरोशिमा-नागासाकीवर परमाणु बॉम्ब टाकला होता याचे मुख्य कारण तानाशहा हिटलर यांची क्रूरता समाप्त करने होती. परंतु याचे प्रायचीत्य संपूर्ण जापानला भोगावे लागले.

यात लाखोंची जीवीत हानीसुध्दा झाली. दिनांक ६ ऑगस्ट या घटनेला ८१ वर्षे पूर्ण झाली. परंतु चीनच्या विस्तारवादी नितीला रोखण्यासाठी अमेरिकेसह नाटोसेनेने चायना सी मध्ये चिनला घेरून ठेवले आहे.सोबतच चीन तैवानला नेहमीच युध्दासाठी उकसवीण्याचे काम करीत असतो. परंतु आता जर युद्ध झाले तर "तिसरे महायुध्द"अटळ आहे.कारण सध्याच्या परिस्थितीत रशिया-युक्रेन, अमेरीका- नाटो-



चीन,इजरायल-हमास-इराण एकमेकांचे कट्टर शत्रू झाले असून सर्वत्र युद्धजन्य परिस्थिती आहे.

कोण केव्हा कोणावर महाविणाशक प्रहार करेल हे सांगता येत नाही व यामुळे अनर्थ केव्हाही उद्भवू शकतो याला नाकारता येत नाही. याला युवावगार्नी कोठेतरी रोखले पाहिजे. कारण चीनने सुपरपावर बनण्यासाठी संपूर्ण हद्द पार केलेल्या आहेत आणि आता डोनाल्ड ट्रम्प टेरिफच्या माध्यमातून जगातील अनेक देशांवर दबाव टाकुन सुपर पॉवरचे वर्चस्व कायम ठेऊन तानाशाह बनण्याचे स्वप्न पाहत आहे.जगातील कोणत्याही देशाचा युवक असो त्याने पशु-पक्षी व मनुष्य प्राणी यांना कोणत्याही प्रकारची इजा होणार नाही अशा पध्दतीचे कार्य अंगीकारले पाहिजे. याकरीता चीनच्या युवकांनी शि. जिंनपिंग यांच्या विनाशकारी बायोवेपन्सचा कडाडून विरोध करून चांगला धडा शिकवला पाहिजे. आज संपूर्ण जगाची धुरा युवकांच्या हाती आहे. मानवजातीचा पृथ्वीतलावर जन्म जनकल्याणासाठी व विकासासाठी झाला आहे. त्यामुळे आजच्या युवकांनी जगाला कोणत्याही परीस्थितीत विनाशापासुन रोखलेच पाहिजे अन्यथा केव्हाही अनर्थ होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही. जर्मनीचा तानाशहा हिटलर यांची कल्पना "विस्तारवादाची" होती.परंतु त्याचे प्रायचित्य "हिरोशिमा - नागासाकीच्या" स्वरूपात "जापानला" भोगावे लागले. याची पुनरावृत्ती चीन व चीनच्या मित्रराष्ट्रामध्ये होवु शकते याला नाकारता येणार नाही.

चीनचे राष्ट्राध्यक्ष शि.जिनपिंग त्याचे विस्तारवादाचे प्रायचीत्य चीनला व त्यांच्या मित्रराष्ट्रांना भोगावे लागेल. त्यामुळे जगातील युवकांनी या युध्दजन्य परीस्थितीला रोखण्यासाठी जागतिक पातळीवर आवाज उठवीण्याची गरज आहे. करोना काळाच्या कठीण प्रसंगात अनेकांची घरे उजाडली, उपासमारी, भुकमरी, बेरोजगारी, महागाई अशा कठीण प्रसंगांना युवकांना व सर्वसामान्यांना तोंड द्यावे लागले होते. आजचा युवावर्ग शारिरीकदृष्ट्या कमजोर असला तरी "बुध्दीच्या" बाबतीत तर्बेज आणि ताकदवर आहे. त्यामुळे आज कोणत्याही संकटाला सामोरे जाण्यासाठी बुध्दीचा योग्य वापर करण्याची वेळ युवकांवर आली आहे. कारण युवाशक्ती "भविष्याची पुंजी" आहे.याची जोपासना करण्याचे काम अनुभवी पीढीने युवकांना मदत करून केले पाहिजे. आज संपूर्ण जगात निसर्गाचा ह्रास मोठ्या प्रमाणात होत असल्याने मानवजाती व संपूर्ण जीवजंतू भयभीत आहे. त्याचप्रमाणे जगातील प्रत्येक देशांनी आपल्या वर्चस्वासाठी मोठ्या प्रमाणात दारुगोळा, घातक क्षेपणास्त्रे व परमाणु बॉम्ब बनवीले आहे. म्हणजेच आज संपूर्ण पृथ्वी "बारुदच्या ढिगाऱ्यावर" बसली आहे.

त्यामुळे प्रत्येक देश विनाशाकडे वाटचाल करतांना दिसत आहे. परंतु विध्वंसकारी व विनाशकारी प्रवृत्तीला युवावर्ग रोखु शकते. प्रत्येक देशाच्या युवकांनी शांतीचा मार्ग स्वीकारण्याचे ठाणले तर प्रत्येक देशाचे राष्ट्राध्यक्ष व राजकीय पुढारी युवकांच्या मार्गाला चालना देवु शकते. आपण हिरोशिमा-नागासिकाचा विनाश पहाला, ४ऑगष्ट २०२० ला "लेबनॉनची राजधानी बेरुत"त्यांची पुनरावृत्ती आपण पहाली हा धमाका हिरोशिमा-नागासिकापेक्षा भयानक असल्याचे सांगण्यात येते, युक्रेन -रशिया युध्दामुळे युक्रेन १०० वर्षे मागे गेला आहे,आज अमेरिका-इराण-इजरायल युद्धामुळे मोठ्या प्रमाणात वित्तीय व जिवित हाणी झाली व ५० वर्षे मागे गेले. पाकिस्तान आतंकवाद्यांनी भरभटला आहे, बांगलादेश हिंसाचाराने जळत आहे. चीन -तैवानमध्ये युध्दाची ठीणगी केव्हाही उडु शकते, इजरायल -हमास-इराण-अमेरिका संघर्ष तिसऱ्या महायुद्धाचे स्वरूप केव्हाही घेवू शकते.म्हणजेच कोणताही दारूगोळा असो त्याचा फक्त एकच मार्ग असतो तो म्हणजे "विनाश" यात सर्वच भरडल्या जाते मग तो कितीही मोठा बलाढ्य देश असो. त्यामुळे जागतिक विनाशाला युवकांनी कोठेतरी रोखलेच पाहिजे अन्यथा अनर्थ होवु शकतो याला नाकारता येत नाही.

सध्याच्या परीस्थितीत युवा शक्ती ही "जगासाठी मोठी पुंजी" आहे. त्यामुळे सर्वांनीच युवकांना सहकार्य करून जी काही जगात विनाशकारी लीला सुरू आहे तीला ताबडतोब रोखण्याची नीतांत गरज आहे. हे कार्य युवकांच्या शक्तीनेच सफल होवु शकते. युवावर्ग सर्वच क्षेत्रात आमूलाग्र प्रगती करीत आहे यात दुमत नाही.परंतु शि.जिनपिंग व उत्तर कोरियाचा तानाशहा कींग्म जॉन उन सारखे जगाला विनाशाकडे नेत आहे. यांच्यावर नियंत्रण लावने अती आवश्यक आहे. संपूर्ण जगातील युवावर्ग, शिक्षणामध्ये व खेळांमध्ये अग्रेसर आहेत. भारतातील युवावर्ग राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय खेळांमध्ये अग्रगण्य भुमिका बजावुन देशाची मान उंचावून सन्मानजनक स्थितीमध्ये आहे. याचे संपूर्ण श्रेय युवकांना जाते.

देशाचा युवा म्हणजे भारताची आन-बाण-शान आहे. आज देशासह जगात अनेक मोठमोठी आव्हाने उभे आहेत त्याचा मुकाबला युवा पिढी (जेन-झी) करू शकते याचे जिवंत उदाहरण भारतासह अनेक देशांत दिसून आले. त्यामुळे आंतराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने युवकांनी देशातील इतर कायासौबत वृक्ष लागवडीकडे लक्ष देवून जास्तीत जास्त वृक्ष लागवडीचा संकल्प केला पाहिजे. कारण पृथ्वीला टिकवून ठेवायचे असेल तर निसर्ग टिकवून ठेवणे आवश्यक आहे. याकरीता वृक्षलागवड सर्वात मोठा रामबाण उपाय आहे. यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर राहण्यास मोठी मदत होईल. जय हिंद!

- स्वतंत्र पत्रकार
मो. ९९२१६९०७७९

# सर्फराजचा 'सरफरोशी' अंदाज आणि टीम इंडियाचा लंकाविजय : एका सराव सामन्याची रंजक गोष्ट

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

क्रिकेटच्या पटलावर कधी काय घडेल याचा काही नेम नसतो. कधी अनपेक्षित दुखापतींचे ग्रहण लागते, तर कधी संघातून बाहेर फेकलेला एखादा जिद्दी खेळाडू स्वतःला सिद्ध करत पुन्हा प्रसिद्धीच्या झोतात येतो. सध्या भारतीय संघ श्रीलंका दौऱ्यावर असून, गाले येथील कसोटी सामन्यापूर्वी पार पडलेला सराव सामना आणि त्या पार्श्वभूमीवर घडलेल्या घडामोडी एखाद्या चित्रपटाच्या थरारक पटकथेला शोभतील अशाच आहेत.

**वजन' कमी, पण जिद्द तीचः सरफराजची संघर्षगाथा**

रणजी ट्रॉफीमध्ये धावांचा डोंगर उभारणारा आणि त्रिशतक झळकावणारा सर्फराज खान हा भारतीय देशांतर्गत क्रिकेटमधला एक मोठा चेहरा. पण कौशल्याची पराकाष्ठा असूनही, "आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी हा फलंदाज खूप जाड आहे," असा शिक्का त्याच्यावर मारला गेला होता. २०२४ मध्ये न्यूझीलंड विरुद्धच्या मालिकेत चार डावांत अपयशी ठरल्यानंतर त्याला संघातून थेट बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. तो काळ सर्फराजसाठी अत्यंत कठीण होता, कारण संपूर्ण संघच त्या मालिकेत चाचपडत होता; पण गाज पडली ती एकट्या सर्फराजवर !

पण सर्फराज हार मानणाऱ्यांपैकी नव्हता. "मी संघात कदाचित सामावून जाणार नाही, पण मी माझी कोणतीही कसर सोडणार नाही," हे त्याचे वाक्य त्याच्या अंतरंगातील ज्वाला स्पष्ट करत होते. त्यानंतर सुरू झाला त्याचा 'मिशन फिटनेस' आणि पुनरागमनाचा खडतर प्रवास! सासरच्या घरी गेल्यानंतर त्याने आहारावर आणि फिटनेसवर कडक नियंत्रणे आणत तब्बल १७ किलो वजन घटवले. मुंबईत जेव्हा अवकाळी पावसाने सरावात अडथळा आणला, तेव्हा त्याने थेट काश्मीरची वाट धरली. 'शेर-ए-काश्मीर' स्टेडियमवर नेटमध्ये तासनतास पसीना गाळत त्याने आपल्या फलंदाजीतील तांत्रिक त्रुटींवर काम केले.

इंग्लंड दौऱ्यावर 'भारत अ' संघाकडून खेळताना बेकेनहॅम येथे शतक ठोकणे असो किंवा इंग्लंड लायन्सविरुद्ध ९२ धावांची तडाखेबंद खेळी असो; सर्फराजची बॅट सतत बोलत होती. ६२ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ६४.७३ ची अफाट सरासरी असूनही, त्याने भारतासाठी आतापर्यंत फक्त ६ कसोटी सामने खेळले होते.

**अखेर नियतीने त्याला पुन्हा संधी दिली!**

डाव्या पायाच्या बोटाच्या दुखापतीमुळे (स्ट्रेस रिएक्शन) साई सुदर्शन श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेतून बाहेर पडला आणि बीसीसीआयने १५ ऑगस्ट २०२६ पासून सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटीसाठी सर्फराजच्या नावावर शिक्कामोर्तब केले. संघात निवड होताच सर्फराजने आपले वडील, माजी क्लब क्रिकेटपटू आणि मार्गदर्शक नौशाद खान यांच्यासोबत बीसीसीआयच्या ट्रेनिंग किटमधील फोटो पोस्ट केला—जो केवळ एक फोटो नव्हता, तर एका बापाच्या स्वप्नाची आणि मुलाच्या अथांग जिद्दीची पावती होती.

**सिराजचे तीन चेंडू, तीन षटकार आणि सराव सामन्याचा 'ट्विस्ट'**

तिकडे कोलंबोमध्ये श्रीलंका-११ विरुद्धच्या तीन दिवसीय सराव सामन्यात क्रिकेट रसिकांना एक भन्नाट नाट्य पाहायला मिळाले. सामन्याच्या अंतिम दिवशी रविवारी भारताला विजयासाठी अवघ्या १६ धावांची गरज होती. क्रीझवर फलंदाज नाही, तर भारताचा हुकमी वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज होता. समोर गोलंदाज होता केसरा नुवान्था. पहिल्याच चेंडूवर सिराजने असा काही फटका मारला की चेंडू थेट सीमारेषेबाहेर ! दुसऱ्या आणि तिसऱ्या चेंडूवरही सिराजने तीच पुनरावृत्ती करत सलग तीन उत्तुंग षटकार ठोकले आणि भारतीय संघाचा ६ गडी राखून विजय निश्चित केला.

पण इथेच या सामन्याचा खरा गंमतशीर भाग सुरू झाला! सामना जिंकल्यानंतरही भारतीय संघ मैदानाबाहेर गेला नाही. सराव सामन्याचे नियम थोडे वेगळे असतात; याचा उद्देश केवळ विजय-पराजयाचा नसून खेळाडूंना स्थानिक परिस्थिती, खेळपट्टी आणि वातावरणाशी जुळवून घेण्याची संधी देणे हा असतो. दोन्ही संघांच्या संमतीने प्लेइंग इलेव्हनमध्ये १५ खेळाडूंचा वापर करता येतो आणि सामना जिंकल्यानंतरही निर्धारित षटके पूर्ण होईपर्यंत फलंदाजी चालू ठेवता येते. पंचांनी नुवान्थाचे ते षटक पूर्ण करू दिले आणि सिराजने विजयाचा अधिकृत आनंद साजरा झाल्यावरही उरलेले तीन चेंडू आरामात खेळून काढले.

**दुखापतींचे सावट, 'कॅप्टन' गिलचे पुनरागमन अन् पडिक्कलचा धमाका**

जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या(डब्ल्यूटीसी) महत्त्वपूर्ण टप्प्यावर पोहोचण्यापूर्वी भारतीय संघाला दुखापतींची मोठी डोकेदुखी सहन करावी लागत आहे. भारताचा प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर दुखापतीमुळे आधीच या मालिकेतून बाहेर झाले आहेत.

त्यातच, गुरुवारी नेट सत्रादरम्यान कर्णधार शुभमन गिलच्या बोटाला दुखापत झाल्याने भारतीय समर्थकांच्या काळजाचा ठोका चुकला होता. खबरदारीचा उपाय म्हणून पहिल्या दोन दिवसांत गिल मैदानावर उतरला नाही आणि त्याच्या अनुपस्थितीत केएल राहुलने कर्णधारपदाची धुरा सांभाळली. मात्र, तिसऱ्या दिवशी दुखापतीतून सावरून मैदानात उतरलेल्या गिलने ४४ धावांची संयमी खेळी केली आणि यशस्वी जयस्वालसोबत (ज्याने पहिल्या डावातही उत्तम कामगिरी केली होती) १०५ धावांची शतकी भागीदारी रचून स्वतःच्या फिटनेसची खात्री पटवून दिली. सोबतच यष्टीरक्षक फलंदाज रिषभ पंतनेही २८ धावांचे हळूवार योगदान दिले.

तत्पूर्वी, भारताने आपला पहिला डाव ३५७/६ वर घोषित केला होता. या डावाचा खरा हिरो ठरला तो देवदत्त पडिक्कल! पडिक्कलने अप्रतिम तंत्राचे प्रदर्शन करत नाबाद १४२ धावांची खणखणीत खेळी साकारली. याशिवाय अष्टपैलू रवींद्र जडेजाने फलंदाजीत ६३ धावा आणि गोलंदाजीत २ बळी टिपत आपली पकड मजबूत केली. मानव सुथार (४१), केएल राहुल (४०) आणि गुरनूर ब्रार (नाबाद ३६ धावा व २ बळी) यांनीही आपापली भूमिका चोख बजावली.

**आता वेध गॉल कसोटीचे!**

श्रीलंका इलेव्हनने पहिल्या डावात ३६३/८ धावा केल्या होत्या आणि दुसऱ्या डावात निशान फर्नांडोच्या ६३ आणि निपुण धनंजयच्या ४६ धावांच्या जोरावर २००/६ वर आपला डाव घोषित केला. भारताला २०७ धावांचे लक्ष्य मिळाले होते, जे भारताने सहज पार केले.

- ९०९६३७२०८२

थोडक्यात

## गडचिरोली आश्रमशाळेतील विद्यार्थिनींच्या सर्पदंशाच्या घटनेबाबत राज्य बालक संरक्षण आयोगाची आढावा बैठक

### बाल हक्क आयोग सदस्य गीतांजली बुटी यांनी नागपुरात घेतली आढावा बैठक



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर/गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यातील आश्रमशाळेत प्रवेशित मुलींना सर्पदंश झाल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य बालक संरक्षण आयोगाच्या वतीने घटनेचा सविस्तर आढावा घेण्यासाठी अपर आदिवासी आयुक्तांसोबत बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये आश्रमशाळेतील विद्यार्थिनींची सुरक्षा, आरोग्यविषयक सुविधा, सर्पदंशाची घटना नेमकी कोणत्या परिस्थितीत घडली, विद्यार्थिनींना देण्यात आलेली वैद्यकीय मदत, उपचारांची व्यवस्था तसेच आश्रमशाळेतील प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आश्रमशाळेच्या परिसराची नियमित पाहणी, स्वच्छता, झुडपे व गवताची साफसफाई, आवश्यक प्रकाशव्यवस्था, सर्पदंशाच्या घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच आपत्कालीन परिस्थितीत तातडीने वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

राज्य बालक संरक्षण आयोगाने आश्रमशाळांमध्ये प्रवेशित बालकांच्या सुरक्षितता व संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश दिले. तसेच अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नयेत यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशा सूचना देण्यात आल्या. यावेळी अपर आदिवासी आयुक्तांसह संबंधित अधिकारी उपस्थित होते. घटनेबाबत करण्यात आलेली कार्यवाही, विद्यार्थिनींच्या आरोग्याची सद्यस्थिती आणि भविष्यातील प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा पुढील काळातही आढावा घेण्यात येणार असल्याचे आयोगाच्या वतीने सांगण्यात आले. सदर आढावा बैठकीला महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोगाच्या सदस्या गीतांजली, बुटी, अप्पर आदिवासी आयुक्त आयुषी सिंग, जिल्हा महिला बालविकास अधिकारी सुनील मेसरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण उपस्थित होते.

## ॲड. बरेठीया अरविंद सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदी नियुक्त



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

अरविंद सहकारी बँक लिमीटेडचे अध्यक्ष व क्षेत्राचे आमदार आशिष देशमुख यांनी बँकेचे संचालक ॲड. चंद्रशेखर बरेठीया यांची नुकतीच उपाध्यक्षपदी नियुक्ती केली. अरविंद सहकारी बँकेच्या नागपुर व अमरावती जिल्ह्यात जवळपास १२ शाखा असुन २२०० कोटीची उलाढाल करणारी एक विश्वसनीय संस्था म्हणून ख्यातीप्राप्त आहे. अश्या संस्थेच्या उपाध्यक्ष पदावर नियुक्ती केल्याबद्दल ॲड. चंद्रशेखर बरेठीया यांनी अरविंद बँकेचे अध्यक्ष तसेच सावनेर कळमेश्वर विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ. आशिषबाबू देशमुख, माजी मंत्री रणजीत देशमुख, भाऊसाहेब भोगे आदिंचे आभार मानले. तर ॲड. चंद्रशेखर बरेठीया यांना अरविंद सहकारी बँकेच्या उपाध्यक्ष पदावर नियुक्त केल्याबद्दल माजी नगराध्यक्ष ॲड. अरविंद लोधी, व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष विनोद जैन, मनोज बसवार, नरेन्द्र वाघेला, किशोर गुहारीकर, पांडुरंग भोंगाडे, तेजसींग सावजी, प्रकाश टेकाडे, ॲड. शैलेश जैन, ॲड. मनोज खंगारे, ॲड. श्रीकांत पांडे, ॲड. जयंत खेडकर,ॲड. भुपेन्द्र पुरे, शंकर ढोके, डॉ. विनोद बोकडे, लक्ष्मीकांत दिवटे आदीने ॲड. चंद्रशेखर बरेठीया यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

## २० ऑगस्टला रंगणार विदर्भ साहित्य संघाचा साहित्य कट्टा, कथालेखकांना सादरीकरणाची संधी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी नियमितपणे आयोजित केला जाणारा 'साहित्य कट्टा' उपक्रम या महिन्यात गुरुवारी, २० ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता होणार



आहे. या महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी स्वातंत्र्यदिन येत असल्याने कार्यक्रमाच्या ठरलेल्या दिवसात हा बदल करण्यात आला असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. यावेळच्या साहित्य कट्ट्यासाठी 'कथा' हा विषय निश्चित करण्यात आला आहे. सहभागी होणाऱ्या कथालेखकांनी आपली स्वलिखित कथा ५ ते ७ मिनिटांच्या वेळेत सादर करणे अपेक्षित आहे. या उपक्रमात नवोदित कथालेखकांना विशेष प्राधान्य दिले जाणार आहे.

१६ ऑगस्टपर्यंत नोंदणी आवश्यक या कार्यक्रमात सादरीकरणासाठी मयार्दा ठेवण्यात आली असून प्रथम संपर्क साधणाऱ्या दहा कथाकारांनाच संधी दिली जाईल. त्यामुळे इच्छुकांनी आपली नोंदणी १६ ऑगस्टपर्यंत निश्चित करणे बंधनकारक आहे. अधिक माहिती व प्रवेश निश्चितीसाठी विदर्भ साहित्य संघाच्या ९९७००९५५६२ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# खापरखेडा पोलिसांचे नेटवर्क पूर्णपणे नॉट रिचेबल आहे का ?

### नागरिकांचा सवाल, दगडी चाळ गँगवार प्रकरणात दहावा आरोपी अटक, शहर गुन्हे शाखा व पारशिवनी आणि कामठी पोलीसांना आले यश, मुख्य सूत्रधारासह डझनभर आरोपी फरार



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा-श्रीकांत जालंधर**

स्थानिक मुख्य बाजारपेठेत घडलेल्या दगडी चाळ गँगवार प्रकरणात दहाव्या आरोपीला अटक करण्यात आली आहे कामठी पोलिसांनी शनिवारला समीर उर्फ बोंमट्या शेख वय २५, रा. चित्रंजन शहानगर, कामठी याला ताब्यात घेऊन खापरखेडा पोलिसांच्या स्वाधीन केले सदर प्रकरणात आरोपींची संख्या १० वर पोहोचली आहे मात्र गुन्ह्याची घटना खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेली असताना एकाही आरोपीला शोधण्यात खापरखेडा पोलिसांना यश आलेले नाही उलट शहर गुन्हे शाखा, पारशिवनी व कामठी पोलिसानी सर्व आरोपींना ताब्यात दिल्याने खापरखेडा पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दगडी चाळ गँगवार प्रकरणात आतापर्यंत मोहन ठाकूर खुरावत, प्रियांशु विद्याधर रक्षित, युगांत राजेश सारवे, हेमंत उर्फ सुदामा मधुकर चाफाडहाके, शांतनू दद्दु राजेंद्र बागडे, जितू रामचंद्र कनोजिया यांच्यासह तीन अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे विशेष म्हणजे मोहन ठाकूर याला पारशिवनी पोलिसांनी पकडून दिले, तर समीर उर्फ बोंमट्याला कामठी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत उर्वरित आरोपींना शहर गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले सदर घटना खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीत घडली असताना खापरखेडा पोलिसांना मात्र सर्व आरोपी आयते हाती लागले आहेत त्यामूळे खापरखेडा पोलिसांचे नेटवर्क पूर्णपणे नॉट रिचेबल आहे का ? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

या प्रकरणातील मुख्य सूत्रधार तडीपार आरोपी सूरज कावळे, शुभम उर्फ शेरू उईके व साहिल उर्फ बुट्या बागडे यांच्यासह तब्बल डझनभर आरोपी फरार आहेत त्यामुळे खापरखेडा परिसरात दहशत निर्माण झाली आहे.

### ममोका लावणार नसाल तरच येतो!

दगडी चाळ गँगवार प्रकरणातील फरार आरोपीं पैकी साहिल उर्फ बुट्या बागडे याने खापरखेडा पोलीस ठाण्यातील एका अधिकाऱ्याला फोन केला असल्याची माहिती समोर आली असून ममोका लावत नसाल तरच आत्मसमर्पण करतो अशी माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे यावरून खापरखेडा पोलिसांचा गुन्हेगारांवर किती वचक आहे हे दिसून येत असून यासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी अपेक्षित आहे.

### निर्णायक लढा आणि गुन्हेगारीमुक्त खापरखेडासाठी आज विशेष आमसभा

खापरखेडा पोलिस स्टेशन हद्दीतील अवैध धंदे, एमडी तस्करी व गुन्हेगारीवर आळा बसावा या हेतूने आज भानेगाव ग्रामपंचायत सभागृह येथे विशेष आमसभेचे आयोजन करण्यात आले आहे. आपले गाव गुन्हेगारीमुक्त व व्यसनमुक्त करण्यासाठी नागरिकांनी एकत्र येण्याचे आवाहनही यावेळी भानेगाव ग्रामपंचायततर्फे करण्यात आले आहे.

## सेवानिवृत्ती कर्मचाऱ्यांची सभा संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, वर्धा**

रविवारला वर्धास्थित श्रध्देय अटल बिहारी बाचपेयी विरंगुळामध्ये केंद्र तथा राज्य कर्मचारी, शासकीय, अशासकीय, लोकल बॉडीज, सेवानिवृत्त वेलफेअर संघटना, वर्धेची सभा दिनांक ९ ऑगस्ट रोजी संपन्न झाली.प्राचार्य अरविंद गवरशेट्टीवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.२७ सप्टेंबर २०२६ रोजी होणाऱ्या नियोजित आम सभा व अधिवेशनाच्या पूर्व तयारीसंबंधी चर्चा करण्यात आली.तसेच कार्यकारिणी सदस्यांना व संघटकांना सदर आमसभा व अधिवेशनासंबंधी पुस्तिका-अहवालांचे संघटनेच्या सदस्यांपर्यंत वितरण करण्याचे व संघटनेच्या सामान्य सदस्याकडून आर्थिक योगदान वसुल करण्याचे व संघटनेचा आर्थिक भार कमी करण्याचे आवाहन करण्यात आले

दरवर्षीप्रमाणे वर्ग १० व १२ वीच्या बोर्ड परीक्षेत उच्च गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा आणि ७५ वर्षावरील निवृत्त ज्येष्ठांचा सत्कार करण्याला उपस्थितांनी मान्यता दिली. तसेच औरंगाबाद न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार १ जुलैच्या काल्पनिक वेतनवाढीचा अजुनही शासनाने अनुकुल निर्णय घेतला नाही,त्याकरिता संबंधितांनी पाठपुरावा करणे व त्याबाबत वर्धा पालक मंत्री पंकजभाऊ भोयर यांना निवेदन देण्याचे ठरले व सदर निवेदन पालक मंत्र्यांना देण्यात आले.



विशेष म्हणजे पेन्शनर्स अशोशियशन, पुणे द्वारा आयोजित राज्य अधिवेशन घेण्याचा बहुमान वर्धा जिल्ह्याला प्राप्त झाला असून त्यासंबंधिच्या आयोजनाबाबतही सभेत चर्चा झाली. राज्य अधिवेशनाचे स्वागताध्यक्षपदाची धुरा पालक मंत्री पंकज भोयर यांच्याकडे सोपविण्याचे सर्वानुमते सदर सभेत ठरले.

नियोजित पेन्शनर्स असोसिएशनच्या राज्यस्तरीय अधिवेशन दि. ५ फेब्रुवारी२०२७ शुक्रवार रोजी आयोजित असून त्याकरिता वर्धा स्थित पिप्री मेघे येथील तुळजाई बॅन्क्वेट हे स्थळ निश्चित केलेले असून त्याखचार्साठी संचालक मंडळ कार्यकारिणी सदस्य व संटकांकडून वर्गणी व सधन निवृत्तांकडून जाहिराती मिळविण्यासही सभेत सर्वांनी दुजोरा दिला. राज्य अधिवेशन आयोजनासंबंधी तयारी वर्धा जिल्ह्याची आमसभा व अधिवेशन आटोपल्यानंतर करण्याचे सर्वानुमते ठरले. सभेला अध्यक्ष अरविंद गवरशेट्टीवार, प्रेमलाल पालिवाल यांनी मार्गदर्शन केले. सभेची व्यवस्था विलास मांडवकर व बाबाराव भोंबले यांनी केली. सभेचे सूत्रसंचालन सचिव शेषराव बिजवार यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. रविशंकर राऊत यांनी मानले. सभेला कार्यकारिणी सदस्य व संघटन मिळून ५० सदस्यांची उपस्थिती होती.

## तायवाडे हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक कॅथ लॅब व रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट सेंटरचे बावनकुळे यांच्या हस्ते उद्घाटन

### अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांचा शुभारंभ



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शताब्दी चौक, नागपूर येथील ९०० खाटांच्या मानांकित तायवाडे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक कार्डियाक कॅथ लॅब आणि रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट सेंटरचा शुभारंभ करण्यात आला. या अत्याधुनिक सुविधांचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर

बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी डॉ. परिणय फुके, विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र आणि मोहन मते, विधानसभा सदस्य, महाराष्ट्र यांची प्रमुख उपस्थिती होती.

रुग्णालयाच्या ऑर्थोपेडिक विभागासाठी सुरू करण्यात आलेले रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट सेंटर हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. गुडघे व कंबरेच्या सांध्याच्या संधिवाताने त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी ही अत्याधुनिक रोबोटिक तंत्रज्ञानाची सुविधा उपयुक्त ठरणार आहे. यामुळे रुग्णांच्या गरजेनुसार गुडघा व कंबरेच्या सांध्याच्या प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया अधिक अचूकपणे करता येणार असून रुग्णांच्या लवकर पुनर्वसनास मदत होणार आहे.

याबाबत ऑर्थोपेडिक व जॉईंट रिप्लेसमेंट सर्जन डॉ. शोनक तायवाडे यांनी सांगितले की, रोबोटिक तंत्रज्ञानामुळे जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेमध्ये अधिक अचूकता साधता येते. प्रत्येक रुग्णाच्या शारीरिक गरजेनुसार उपचाराचे नियोजन करणे शक्य होत असल्याने रुग्णांना त्याचा मोठा फायदा होणार आहे. दरम्यान रुग्णालयात अत्याधुनिक फिलिप्स कार्डियाक कॅथ लॅबसह कार्डिओलॉजी विभागाचीही सुरुवात करण्यात आली आहे. या सुविधेचा लाभ मनीषनगर, बेसा, बेलतरोडी तसेच नागपूर शहर आणि विदर्भातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात होणार आहे. हृदयाशी संबंधित गंभीर आजार असलेल्या रुग्णांसाठी ही सुविधा अत्यंत महत्त्वाची ठरणार असून अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी तसेच विविध इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजी उपचार येथे करता येणार आहेत.

गोल्डन अवर्समध्ये हृदयरुग्णांना तातडीने वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे हा या अत्याधुनिक कॅथ लॅबच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश आहे. हृदयविकाराच्या गंभीर परिस्थितीत वेळेवर उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने या सुविधेमुळे परिसरातील रुग्णांना मोठा फायदा होणार आहे. अत्यंत कमी कालावधीमध्ये तायवाडे मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटलने नागपूर शहरामध्ये नामवंत हॉस्पीटलच्या यादीमध्ये आपले स्थान निर्माण केले असून हॉस्पीटलचे एकूण वाटचालीमध्ये माझे सहकार्य असेल असे गौराद्गार चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

## भिवापूर तालुक्यात सीईओंचा दौरा

### वृक्षारोपणासह ड्रीम लायब्ररी, एआय अंगणवाडीची पाहणी



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी (आयएएस) यांनी मंगळवारी भिवापूर तालुक्यातील तास, नक्षी, चिचाळा, बोटेझरी, मुचेपार आणि नांद येथे भेट देऊन विविध विकासकामांची पाहणी केली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल उंदीरवाडे व गटविकास अधिकारी डॉ. चेतन जाधव उपस्थित होते. तास येथे ग्रामस्थ व विद्यार्थ्यांच्या सहभागातून पांदणरस्त्याच्या दुतर्फा ४०० वृक्षांची लागवड करण्यात आली. नक्षी व बोटेझरी येथे प्रत्येकी २०० वृक्षांचे रोपण करण्यात आले.

दौऱ्यात ड्रीम प्रोजेक्टअंतर्गत लायब्ररी, स्मार्ट अंगणवाडी आणि एआय अंगणवाडीची पाहणी करण्यात आली. नांद येथील ड्रीम प्रोजेक्टअंतर्गत उभारण्यात आलेल्या जिल्ह्यातील सर्वात मोठ्या लायब्ररीचे उद्घाटन करून विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. ग्रामपंचायतींच्या स्वच्छता, नियोजन व नाविन्यपूर्ण उपक्रमांचा आढावा घेत महामुनी यांनी संबंधितांना मार्गदर्शन केले. मुचेपार येथील 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राच्या विकासकामांबाबतही अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली.

## विदर्भातून प्रथमच महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी संदीप जोशी यांनी निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटनेचे अध्यक्ष तथा माजी आमदार संदीप जोशी यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे विदर्भाला प्रथमच महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदाचा मान मिळाला आहे. त्यामुळे विदर्भाच्या क्रीडा



क्षेत्रासाठी ही निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची बैठक शुक्रवारी मुंबई येथे पार पडली. या बैठकीत वरिष्ठ उपाध्यक्षपदासाठी संदीप जोशी यांच्या नावाचा प्रस्ताव मांडण्यात आला. कार्यकारिणीने त्यास मंजुरी देत त्यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब केले. जोशी यापूर्वी असोसिएशनचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. असोसिएशनच्या अध्यक्षपदाची जबाबदारी यापूर्वी दिवंगत अजित पवार यांच्याकडे होती. त्यांच्या निधनानंतर वरिष्ठ उपाध्यक्ष असलेले केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची अध्यक्षपदी सवार्नुमते निवड करण्यात आली. त्यामुळे रिक्त झालेल्या वरिष्ठ उपाध्यक्षपदावर संदीप जोशी यांची निवड करण्यात आली.

जोशी हे महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटनेचे अध्यक्ष असून, हॉकी, कुस्ती तसेच विविध क्रीडा संघटनांशी ते सक्रियपणे जोडलेले आहेत. खेळाडूंना प्रोत्साहन देणे, क्रीडा सुविधांचा विकास करणे आणि विविध क्रीडा प्रकारांना चालना देण्यासाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे. त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

### क्रीडा क्षेत्रातील योगदानाची पावती

निवडीनंतर प्रतिक्रिया देताना संदीप जोशी यांनी हे पद केवळ सन्मानाचे नसून मोठी जबाबदारी असल्याचे सांगितले. महाराष्ट्र आणि विदभार्तील खेळाडूंना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे, क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास करणे तसेच ऑलिम्पिक चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. विदर्भाला मिळालेला हा मान मोठ्या क्रीडा यशात रूपांतरित करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

थोडक्यात

## नक्षी येथे वृक्षारोपणासह एआय वाचनालय, डिजिटल अंगणवाडीचे लोकार्पण

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

वृक्षदिनाचे औचित्य साधून गट ग्रामपंचायत नक्षी येथे हरित महाराष्ट्र अभियानांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन



मंगळवारी (११) करण्यात आले. यावेळी एआय वाचनालयाचे तसेच डिजिटल अंगणवाडीचे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक कुणाल उंदीरवाडे, तहसीलदार संजय राठोड, गटविकास अधिकारी डॉ. चेतन जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सरपंच अनिकेत वराडे, उपसरपंच राजेंद्र आदमने, ग्रामपंचायत सदस्य, विविध विभागांचे अधिकारी, शिक्षक, महिला बचत गटांच्या सदस्या, विद्यार्थी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वृक्षारोपणासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाची सुविधा उपलब्ध करून देणारे एआय वाचनालय आणि बालकांच्या शिक्षणाला डिजिटल माध्यमाची जोड देणारी अंगणवाडी सुरू करण्यात आल्याने गावाच्या शैक्षणिक व पर्यावरणीय विकासाला चालना मिळणार आहे.

## भारत विकास परिषद दक्षिण-पश्चिम शाखेची राष्ट्रीय समूहगान स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

देशभक्तीपर गीतांनी भारलेल्या वातावरणात भारत विकास परिषद, दक्षिण-पश्चिम शाखेची राष्ट्रीय समूहगान प्रतियोगिता स्थानिक मुंडले सभागृहात उत्साहात पार पडली. नागपुरातील १२ शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. 'राष्ट्रीय चेतना के स्वर' या परिषदेच्या पुस्तकातील एक हिंदी व एक संस्कृत गीत सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी माजी न्यायमूर्ती भूषण धर्माधिकारी प्रमुख अतिथी म्हणून तर अविनाश शिंदे यांनी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

हिंदी व संस्कृत या दोन्ही गीतांच्या एकत्रित गुणांच्या आधारे आर. एस. मुंडले विद्यालयाने प्रथम क्रमांक, नारायण विद्यालयाने द्वितीय क्रमांक, तर ब्लाइंड स्कूलने तृतीय क्रमांक पटकावला. एस.ओ.एस., अत्रे ले-आऊट यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. तर केवळ संस्कृत गीतासाठीच्या पारितोषिकात सोमलवार विद्यालयाने प्रथम, तर सरस्वती विद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळवला. हिंदी गीताच्या स्वतंत्र गटात सांदीपनी स्कूलने प्रथम, तर दीनानाथ हायस्कूलने द्वितीय क्रमांक पटकावला. नीरजा वाघ, अनुराधा सैनिक आणि निखिल मडावी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. यावेळी दक्षिण-पश्चिम शाखेच्या अध्यक्षा शुभांगी काकडे, सचिव उषा घुई आणि कोषाध्यक्ष मिलन काळे यांनी सर्वांचे आभार मानले. क्षेत्रीय महिला सहभागिता संयोजक सीमा मुनशी, प्रांत अध्यक्ष दिलीप गुळकरी, महासचिव आसावरी वरकड, कोषाध्यक्ष राहुल बजाज यांच्यासह अन्य प्रांत पदाधिकारी व भारत विकास परिषदेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दैनंदिन शिस्त आणि नियोजन हेच यशाचे सूत्र : उमाकांत राघटाटे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशनतर्फे व्यवसाय व्यवस्थापन आणि




सामाजिक विकास या विषयांवर दोन मार्गदर्शनपर सत्रांचे आयोजन करण्यात आले. 'कमाया बहुत, लेकिन बचाया कुछ नहीं' या विषयावरील सत्रात विमा व वित्तीय सेवा क्षेत्रातील ३० वर्षांहून अधिक अनुभव असलेले उमाकांत राघटाटे यांनी यश हे एका दिवसात मिळत नसून, दैनंदिन शिस्त, नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित असल्याचे सांगितले. वेळेचे नियोजन, नियमित व्यायाम, जबाबदाऱ्यांचे योग्य वाटप आणि आर्थिक शिस्त यावर त्यांनी भर दिला. ग्राहकांच्या गरजा समजून घेतल्याशिवाय कोणतेही आर्थिक उत्पादन विकू नये, तसेच व्यवसायात बचत आणि सातत्यपूर्ण सुधारणा आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या सत्राचे सूत्रसंचालन आश्लेष देशमुख यांनी केले.

दुसऱ्या सत्रात शेअर अवर स्ट्रेंथ संस्थेचे कार्यकारी उपाध्यक्ष चक स्कोफिल्ड यांनी बालकांमधील कुपोषण आणि उपासमार कमी करण्यासाठी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सरकार, स्वयंसेवी संस्था आणि कॉर्पोरेट क्षेत्राच्या सहकार्याने पोषण कार्यक्रम राबविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. भारतातील सामाजिक संस्थांसोबत सहकार्य करण्याची संस्थेची तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले. या सत्राचे सूत्रसंचालन आलोक धोटेकर यांनी केले.

# युवकांना राष्ट्रनिर्मितीची दिशा देणाऱ्या ‘Know Your Icon’ पुस्तकाचे प्रकाशन

### 'मंथन 4 युवा - नागपूर २०२६' अंतर्गत आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कायार्चा, विचारांचा, विकासदृष्टीचा आणि नेतृत्वगुणांचा परिचय नव्या पिढीला करून देण्याच्या उद्देशाने 'मंथन4युवा - नागपूर २०२६' अंतर्गत साकारण्यात आलेल्या ‘Know Your Icon’ या पुस्तकाचे प्रकाशन मंगळवारी करण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात आयोजित कार्यक्रमात महापौर नीता ठाकरे यांच्या हस्ते पुस्तकाचे डिजिटल प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर नीता ठाकरे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, तर विशेष अतिथी म्हणून उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. संतोष चव्हाण, तंत्र शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. मनोज डायगव्हाणे आणि कुलसचिव डॉ. विजय खंडाळ, 'मंथन4युवा' चे संयोजक विष्णू चांगदे व रितेश गावंडे यांची मंचावर उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

**युवकांच्या ऊर्जेला दिशा देणारा उपक्रम - महापौर नीता ठाकरे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे युवकांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असून त्यांच्या नेतृत्वगुणांतून आणि कार्यशैलीतून युवा पिढीने प्रेरणा घ्यावी. संत ज्ञानेश्वर महाराज, छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत युवकांनी राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात योगदान द्यावे, असे आवाहन करताना त्यांनी नो युअर आयकॉन हा उपक्रम युवकांमध्ये सकारात्मक विचार आणि राष्ट्रभावना रुजविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वासही व्यक्त केला.

**विकसीत महाराष्ट्राचे स्वप्न साकारण्यासाठी पुढे या : डॉ. मनाली क्षीरसागर**

विकसित भारत, विकसित महाराष्ट्र आणि विकसित नागपूर २०४७चे स्वप्न साकारण्यासाठी सक्षम मानवी संसाधनाची आवश्यकता आहे. ते घडविण्याचे काम सर्वांनी एकत्रितपणे करावे. या उद्देशाने आयोजित विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, यासाठी शिक्षक आणि पालकांनी त्यांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन डॉ. मनाली क्षीरसागर यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कार्यातून युवकांना आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवोपक्रम आणि कौशल्य विकासासोबतच राष्ट्रनिर्मितीच्या दिशेने प्रेरित केले आहे. त्यांच्या कायार्चा आणि विचारांचा वेध घेणारे ‘Know Your Icon’ हे पुस्तक प्रश्नोत्तरांच्या अभिनव स्वरूपात तयार करण्यात आले असल्याचे माहिती विष्णू चांगदे यांनी प्रास्ताविकातून दिली. संजय ढोबळे यांनी पेटेंट गॅलरी उपक्रमाची माहिती दिली तर सोमदत्त करंजीकर यांनी विकसीत नागपूर हॅकेथॉन स्पर्धेविषयी सांगितले.

केतन मोहितकर यांनी स्टार्टअप कॉन्क्लेव्ह बद्दल तर डॉ. अभय मुद्गल यांनी मंथन कल्चरल फेस्ट बद्दल माहिती दिली. युवकांमधील नेतृत्वगुण लक्षात घेऊन कॅम्पस लिडर समिट व स्पर्धा परीक्षा संमेलनाची माहिती नितीन कायरकर यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा श्रीपाद यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. राजेश गादेवार यांनी केले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी 'मंथन4युवा' अभियानाचे संचालन समितीचे डॉ. राजेश गादेवार, डॉ. देवेंद्र भोंगाडे, डॉ.अभय मुद्गल, केतन मोहितकर, डॉ.संजय ढोबळे, डॉ. सोमदत्त करंजीकर, विनय चावला, प्रकाश शुक्ला, निधी बावशे, डॉ. सचिन हजारे, डॉ. प्रदीप बिबटे, विनोद कडू, डॉ. राजेश ढोबळे, डॉ. विजय दातारकर, वैभव बावनकर, डॉ. सुमित सिंह, डॉ. राजेश देवकाते, डॉ. गजानन पोलनवार यांचे सहकार्य लाभत आहे.

### ‘Know Your Icon’ वर स्पर्धा परीक्षा

युथ आयकॉन हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्य, विचार आणि नेतृत्वावर आधारित प्रश्नोत्तरांच्या स्वरूपातील ‘Know Your Icon’ हे पुस्तक आहे. इयत्ता १ ली ते १२ वी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी या पुस्तकावर आधारित टउद परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवोपक्रम, कौशल्य विकास आणि राष्ट्रनिर्मितीची दिशा युवकांना देणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.




# गंगाझरी अंतर्गत मौजा बेरडीपार स्मशान घाट परिसरातील खुनाचा केला उलगडा

### पोलीस स्टेशन गंगाझरी व स्थानिक गुन्हे शाखा गोंदियाची संयुक्त कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

दिनांक ९ ऑगस्ट रोजी पो. स्टे. गंगाझरी अंतर्गत ग्राम बेडीपार स्मशान घाट परिसरात मोहम्मद इक्बाल शहा फकीर राहणार फकीरटोली काचेवाणी याचे प्रेत संशयस्थितीत मिळून आल्याने पोस्टे गंगाझरी येथे नुरी इकबाल फकीर वय ४० वर्ष राहणार फकीरटोली काचेवाणी हिचे तक्रारीवरून नंबरी पोलीस स्टेशन गंगाझरी येथे मर्ग दाखल करण्यात आला होता. सदर मर्ग हा संशयास्पद असल्याने पोलीस अधिक्षक गोंदिया गोरख भामरे यांचे निर्देशाप्रमाणे उपविभागीय पोलीस अधिकारी सा. तिरोडा गुल्हाने व पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे, स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा गोंदिया येथील अधिकारी व अमंलदार तसेच पोलीस स्टेशन गंगाझरीचे ठाणेदार स. पो. नि. धीरज राजूरकर व पोलीस स्टेशन



गंगाझरी येथील पोलीस पथक हे करीत असताना गुप्त माहिती प्राप्त झाली कि सदरचा खून मौजा काचेवानी व गोंडीटोला (कुडवा) येथे राहणारे तीन विधी संघर्षीत बालक यांनी केला आहे.

मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस स्टेशन गंगाझरी चे ठाणेदार स.पो.नि. धीरज राजूरकर यांनी तिन्ही विधी संघर्षीत बालक याना ताब्यात घेऊन मोहम्मद इक्बाल शहा फकीर राहणार काचेवानी याचे मर्ग संबंधाने विचारपूस केली असता त्यांनी सांगितले कि मृतक सोबत जुन्या असलेल्या वादावरून तिघांनी कट रचून मोहम्मद इक्बाल शाह फकीर राहणार फकीरटोली काचेवाणी यास दिनांक ०८/०८/२०२६ रोजी संध्याकाळी १९.३० वाजता दरम्यान मृतक यास दारू पिण्यासाठी सोबत ग्राम बेरडीपार येथील स्मशान घाट परिसरात घेऊन आले व त्याचा गड्यावर व पाठीवर चाकूने मारून जीवाने ठार केल्याची कबुली दिल्याने परि पोउपनि अजित धाराव, पो. स्टे . गंगाझरी यांच्या चौकशी अहवालावरून पोस्टे गंगाझरी येथे कलम १०३(१), ६१ (२), ३(५) इठर अन्य गुन्हा नोंद करण्यात आला आहे व पुढील तपास सुरु आहे.

सदरची कामगीरी गोरख भामरे, पोलीस अधिक्षक, गोंदिया, भय डोंगरे, अपर पोलीस अधिक्षक गोंदिया, उपविभागीय पोलीस अधिकारी सा. तिरोडा श्री गुल्हाने, स्थानिक गुन्हे शाखा गोंदियाचे पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन गंगाझरीचे ठाणेदार स.पो.नि. धीरज राजूरकर , पो. उप.नि.धाराव, परी पोउपनि गवई, पोहवा भुरे, पो.हवा. देशपांडे, पो.हवा. कावळे, पोना कटरे, पो. शी. राऊत, पो. शी. नागपुरे, पो. शि. जनेवार, पो.शी. गौतम, चापोशी चांदेवार, चापोहवा बघेले तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सफौ राजू मिश्रा, पो.हवा. सोमेन्द्रसिंग तुरकर, पोहवा रियाज शेख, पोहवा महेश मेहर, पोहवा भोजराज बहेकार, पोहवा इंद्रजित बिसेन, पोहवा राजकुमार खोटेले, पोहवा सुजित हलमारे, पो.शि. हंसराज भांडारकर, पो.शि.छगन विठ्ठले, पो.शि. चापोशि. मुरली पांडे, चापोशि इमरान शेख यांनी केली आहे.

## NEP २०२०च्या ३-२-१ पॅटर्ननुसार शैक्षणिक बदलांवर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**२०० हून अधिक प्राध्यापकांचा सहभाग; नवीन शैक्षणिक संरचना, अभ्यासक्रम व क्रेडिट प्रणालीवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन**




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्र २०२६-२७ पासून लागू होणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत ३-२-१ पॅटर्ननुसार विज्ञान, वाणिज्य व मानव्यविद्या शाखांची शैक्षणिक संरचना, योजना आणि अभ्यासक्रम याबाबत प्राध्यापकांना सखोल मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. शनिवारी ८ ऑगस्ट रोजी हजरत बाबा ताजुद्दीन कला व वाणिज्य महाविद्यालय, ताजाबाद शरीफ, उमरेड रोड येथे कार्यशाळा उत्साहपूर्ण पार पडली.

या कार्यशाळेला विज्ञान, वाणिज्य व मानव्यविद्या शाखांमधील २०० हून अधिक प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. हजरत बाबा ताजुद्दीन कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर; अशोक मोहरकर कला व वाणिज्य महाविद्यालय, अड्याळ; यशोदा कन्या कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर; मारिया कला व विज्ञान महाविद्यालय, देवळी, वर्धा; उम्मे सलमा कला व विज्ञान महाविद्यालय, नागपूर तसेच अंजुमन कला महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राला आमदार अभिजित वंजारी आणि आमदार सुधाकर अडबाले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शादाब एज्युकेशन सोसायटी, नागपूरचे अध्यक्ष अब्दुल सलीम अब्दुल जब्बार होते. कार्यशाळेचे प्रमुख आयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अ.शकिल अ.सत्तार यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.

# पावसाळ्यात 'कंटोला'ची धूम, किलोला तब्बल ४०० रुपयांचा भाव!

### नरखेड तालुक्यात रानभाजी दाखल, कमी आवक अन् वाढती मागणीमुळे दर वधारले

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

पावसाळा सुरू होताच ग्रामीण भागातील रानभाज्यांची आवक बाजारपेठेत वाढू लागली असून, यंदा 'कंटोला' अर्थात कर्कोटकी, करटुले या रानभाजीने बाजारात चांगलाच भाव खाल्ला आहे. नरखेड तालुक्यात कंटोला दाखल झाला असून सध्या बाजारात त्याला तब्बल ४०० रुपये किलोपर्यंत भाव मिळत असल्याने ग्राहकांचे लक्ष या रानभाजीकडे वेधले गेले आहे. कमी आवक आणि वाढती मागणी यामुळे कंटोल्याचे दर चांगलेच वधारले आहेत.



पावसाळ्यात जंगल, शेताचे बांध, झुडपे तसेच मोकळ्या रानात नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या विविध रानभाज्यांना ग्रामीण भागात विशेष महत्त्व आहे. पारंपरिक आहाराचा भाग असलेल्या या भाज्यांची चव वैशिष्ट्यपूर्ण असल्याने पावसाळ्यात त्यांची मागणी वाढते. त्यामध्ये हिरव्या रंगाची आणि काटेरी साल असलेल्या कंटोल्याला नागरिकांकडून विशेष पसंती मिळत आहे.

नरखेड तालुक्यातील विविध गावांमधील नागरिक कंटोला गोळा करून स्थानिक बाजारपेठेत विक्रीसाठी आणताना दिसत आहेत. पहाटेपासून शेताच्या बांधावर, जंगल परिसरात आणि रानात कंटोला शोधण्यासाठी नागरिकांची लगबग सुरू आहे. गोळा केलेल्या रानभाजीची विक्री करून ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना पावसाळ्यात अतिरिक्त उत्पन्न मिळत आहे. विशेषतः महिला व ग्रामीण भागातील नागरिकांसाठी रानभाज्यांची विक्री हा रोजगाराचा एक छोटासा आधार ठरत आहे.

कंटोल्याची आवक मर्यादित असताना ग्राहकांकडून त्याला मोठी मागणी असल्याने त्याचा भाव वाढला आहे. बाजारात कंटोला उपलब्ध होताच ग्राहकांकडून त्याची खरेदी केली जात आहे. नियमित भाजीपाल्यापेक्षा वेगळी चव आणि पारंपरिक खाद्यपदार्थ म्हणून कंटोल्याला मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे.

कंटोल्याची भाजी कांदा, लसूण आणि विविध मसाल्यांचा वापर करून केली जाते. गरमागरम भाकरीसोबत कंटोल्याची भाजी हा ग्रामीण भागातील नागरिकांचा पावसाळ्यातील आवडता बेत मानला जातो. त्यामुळे बाजारात कंटोला दिसताच ग्राहकांकडून त्याची खरेदी केली जात आहे.

पावसाळ्यात नरखेड तालुक्यात टाकळा, अळू, भारंगी, कुड्याची भाजी यासह विविध रानभाज्यांची आवक होत असून बाजारपेठेत रानभाज्यांची रेलचेल पाहायला मिळत आहे. मात्र यंदा कंटोल्याला मिळणारा ४०० रुपये किलोपर्यंतचा भाव चर्चेचा विषय ठरला आहे. कंटोला आला अन् पावसाळा खुलला, अशी भावना ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

दरम्यान, रानभाजी खरेदी करताना तिची योग्य ओळख असणे आवश्यक आहे. अनोळखी किंवा चुकीची ओळख असलेली वनस्पती खरेदी करून सेवन करू नये. विश्वासार्ह विक्रेत्याकडून योग्य ओळख असलेली रानभाजीच खरेदी करून सेवन करावे, असे आवाहन जाणकारांकडून करण्यात येत आहे.

# रेखाचित्रांचा बादशहा : श्रीधर अंभोरे

डॉ. अशोक रा. इंगळे
अकोला

विदर्भभूमी अर्थात मुक्काम चिखलगाव, ता.पातूर जि. अकोला येथील रहिवासी असलेले चित्रकार श्रीधर अंभोरे होते.'रेषा' या त्याचं प्राणतत्त्व होत्या. त्यांच्या रक्ताच्या 'डीएनए' मध्ये देखील रेषाच गवसेल. त्यांच्या उत्कट भावाभिव्यक्तीचं प्रभावी संवादमाध्यम देखील रेषाच. म्हणून मी श्रीधर अंभोरेंना 'रेषाचित्रांचा बादशहा' असं म्हटलं आहे. 'बादशहा' म्हणजे सम्राट. रेषाचित्र कलेच्या क्षेत्रातील 'सर्वोच्च अधिकारी पुरुष' असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. या अथार्नं ते संबोधन आलं आहे. अंभोरेंना रेषाचित्रांच्या संदर्भात ते संबोधन चपखल लागू पडतं.? त्यासाठी फक्त या 'रेषांच्या' या निबिड जंगलातून फिरून येणं गरजेचं ठरतं.

मूलतः अंभोरेंच्या चित्रांचा रंग हा 'कृष्णधवल' स्वरूपाचा. आणि या पृथ्वीचा मूळ रंग देखील काळा आणि पांढरा. या दोन निसर्ग निर्मित रंगातून त्यांनी आपली लक्षवेधी चित्रसृष्टी निर्मिली. त्यामुळे अंतरगाभ्यातून साकार झालेली ही निर्मिती अक्षरशः मनाला स्तंभित करणारी वाटते. ती डोळ्यांना ज्ञानाचे नवे चक्षु प्रदान करते. हे प्रज्ञाचक्षू सत्य स्वीकारतात आणि आपल्या रेषांच्या कवच कुंचल्यातून ते मांडतात देखील. त्यामुळे त्यांची रेखाचित्र इतकी अद्भूत बनली आहेत. मानवी संवेदना प्रकट करणाऱ्या आणि प्रज्ञाचक्षूला ते विलक्षण दिपवून टाकतात एवढं मात्र खरं.

ज्याप्रमाणं कवितेत शब्द अर्थाचे वाहक बनून येतात. कवितेतील शब्दच माणसांच्या अंतर्मनातील भावना, संवेदना आणि विचार प्रकट करीत असतात. अगदी त्याप्रमाणं श्रीधर अंभोरेंच्या चित्रातील 'रेषा' या सजीव बनून भावना, विचार आणि संवेदना वाहून नेतात. हा केवळ भावानुवाद नसतो. तर त्या चित्रातील रंग, लय व नादवृत्ती मनाला आकर्षित करते. त्यामुळे तो कलारसिकांसोबत केलेला रेषासंवादच असतो.

या रेषासंहितेतील संवादात एतद्देशीय कला संस्कृतीसह समग्र जीवनाचं दर्शन घडतं. अभोरेंना असलेलं सृष्टीज्ञान रेषांमधून अनुभूतीला येते. त्यांच्या या चित्रसृष्टीत भोवतालचा निसर्ग, गुरं, ढोरं, वाडा, गोठा, कामगार, स्त्रिया, पशू, पक्षी, काटेरी झाडं, झुडपं, कुत्र्यांची दिंडी, गाढवं, डुकरं, बकऱ्या, घोडे, गायी, बैल, भिकारी शोषित आणि वंचित अवस्थेतील असंख्य मानवी चेहरे या रेषांमधूनच पाहायला मिळतात. खरं म्हणजे १९७२ पासून चालू झालेला हा चित्रप्रवास २०२२ मध्ये सुवर्णमयी वर्षात आला असला तरी अव्याहतरित्या सुरूच आहे. आज अंभोरेच्या चित्रांचं सूक्ष्म अवलोकन केल्यास या चित्रांनी परिवर्तनीय वळणे घेत, ही रेषाचित्र ग्लोबल वळणावर सशक्तपणे उभी आहेत. या चित्रांनी पंधरा देशाचा फेरफटका मारला आहे, असं गुगल इंजिन सर्च केल्यास लक्षात येईल.

जगात चित्रकलांमध्ये अनेक चित्रकार निपुण आहेत पण 'रेषाकला' ही फक्त अंभोरेंची अद्भूत निर्मिती आहे. असा चित्र प्रेमापोटी रेषामय झालेला चित्रकार भारतीय चित्रसृष्टीत विरळच म्हणावा लागेल. रेषामूल्याचं सजग भान असलेले अंभोरे हे मानवी मूल्यांचे जसे उपासक ठरतात, तसेच कलेचे देखील ते निस्सीम उपासक आहेत. म्हणूनच ते मानवी मनाचे सगळे आकार, विकार आणि भावाकार रेषांच्या चिमटीत पकडतात. या चित्रांना जी विलोभनीयता प्राप्त झालेली आहे, ती गूढरम्य नसून भावरम्य वाटते. अश्या अनोख्या सौंदर्यसर्जक दृष्टीमुळं ही चित्र मानवी मनाचा कधी कब्जा घेतात, ते कळत सुद्धा नाही. इतकी ती रेषा अंतर्मनातून आलेली असते.

अनेकविध चित्रांमधून त्यांचा चित्रविषयक दृष्टिकोन प्रतीत होतो. आदिवासी, कष्टकरी, कामगार स्त्रीकडं बघण्याचा अंभोरेंचा स्वतंत्र करूणामय दृष्टिकोन आहे. आपल्या स्त्री चित्रातून अंभोरे निर्सगानं बहाल केलेलं सौंदर्य रेखाटतात. जे सौंदर्य इतर स्त्री चित्रात गवसत नाही ते सौंदर्य इथं प्रत्ययाला येते. असा अनेक चित्रांतील भावाशय अभोरेंनी अलगद टिपला आणि जोंधळेंनी तो तितक्याच लालित्यबद्ध भाषाशैलीतून साकारला. त्यामुळं या लेखांना अनुभव प्रत्ययता लाभली आहे. वस्तुतः ही चित्र पाहताना कलात्मकतेचा स्पर्श किंचितसा बघणाऱ्याला होतो, तसाच संवेदनक्षम प्रत्यय ललित लेख वाचताना रसिकांना जाणवत राहतो. कलेची श्रीमंती साधनं तथा स्टुडिओ यावरून करायची नसते. हे अभोरेंच्या रेषाचित्रांवरून सहज ध्यानात येईल. ते रानोमाळ, जंगलात, गावोगावी, शहरोशहरी सतत भटकत असतात. त्यातून ही समग्र रेषानगरी साकारली आहे. साकार झालेली ही रेषाचित्र आणि रेषाधराला पाहिले तर ही चित्र अंभोरेंची निर्मिती असतील असं वरवर कुणालाही वाटणार नाही. इतकी ही भावस्सल निर्मिती त्यांनी केलेली आहे.

श्रीधर अंभोरेंच्या रेषांमध्ये समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र आणि मानवी तत्त्वज्ञानाचं संचित दडलेलं जाणवतं. शिवाय व्यक्तीच्या मुखावरील सांस्कृतिक भाव टिपनं भल्याभल्यांना जमत नाही, मात्र इथे तो भाव प्रकर्षानं प्रकट होतो. त्यामुळे या रेषा एकतत्त्वीय दर्शन मांडत नाहीत तर बहुतत्त्वीय सांस्कृतिक जीवनाचं दर्शन घडवितात. म्हणूनच या रेषा देश, प्रदेश ओलांडून अखिल मानव जातीला एका धाग्यात गुंफतात. दरकोस दर मुक्काम भटकणाऱ्या भटक्या विमुक्तांचं बिराड या रेषा अलगद टिपतात. मेंढरं, बकऱ्यांचा कळप हेरतात. स्त्रियांच्या झुंडी हेरतात. नदीवर दुःखाचं धुणं धुणाऱ्या बाया टिपतात. मोर्चातला वेदनामय आक्रोश अंकित करतात. करूणामय बुद्ध अफलातून रेखाटतात. एकतारी भजन कीर्तनातील वारकऱ्यांचा भक्तीभाव टिपतात.



असंख्य आशयांनी वलयांकित झालेली रेषा उमेद हरवलेल्या माणसाला जगण्यासाठी ताठ कणा प्राप्त करून देते. दबलेल्या वंचित मनाची वेदना, विद्रोह आणि आक्रोश मांडते. असा मानवी जीवनाचा गोषवारा या रेषेत दडलेला आहे. एकूणच काय तर विस्थापितांच्या विस्कटलेल्या जगण्याची मांडणी करणारी त्याची अस्तित्वरेषा आपल्या अस्मितेचा अर्थ उकलत जाताना दिसते. ज्याला जे गवसते तशी ही रेषा त्याला चुंबकीय तत्त्वागत आपल्याकडं खेचून घेते. हेच या रेषांचं अंगभूत आणि मूलभूत वैशिष्ट्यं आहे.

श्रीधर अंभोरेंच्या रेषांमधली सूचक भावनिर्मिती शोधून काढणं तसं अवघडच. तरीही या रेषांच्या अंतरंगात मनुष्य शिरला की, त्या रेषा सहज उलगडत जातात. सौंदर्य आणि अर्थवत्ता याचा सुंदर अन्वय साधल्यामुळं या रेषांमधली कलात्मकता अधिक ठळक उठून दिसते. सामाजिक भान घेऊन आलेली ही रेषा सूक्ष्म अवलोकनातून कृषी, आदिवासी व भटक्या विमुक्तांच्या संस्कृतीला उजागर करते. तेथील बाया, माणसं व निसर्ग मनभरून या रेखाचित्रांमधून आपल्याशी मूक संवाद साधतात. ही मोठीच किमया अंभोरेंच्या रेषांमध्ये दडली आहे. वंचित, उपेक्षित बाया माणसांच्या चेहऱ्याचा आकार घेताना या रेषा खूपच भावूक होतात. हळव्या मनानं त्यांच्या अंतर्मनातील व्यथा, वेदनांना अलगद साकार करतात. म्हणून या रेषा सर्वांना दिलखेचक वाटतात असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

वर्तमानाचा विचार केला तर एआय तंत्रज्ञानामुळे चित्रसृष्टी आमुलाग्र बदललेली असताना अंभोरे मात्र अजूनही पांढऱ्या कागदावर काळ्या रेघोट्या ओढतात. तरीही, या रेषा कमालीच्या अद्भूत ठरतात. कारण या रेषां अनुभवाच्या मुशीतून आलेल्या असतात. त्यांना गर्भित जीवनाचा, वाचन, चिंतनाचा स्पर्श लाभलेला असतो. अंभोरेंच्या अफाट वाचन आणि निरीक्षण शक्तीमुळे या रेषा सजीव होतात. आपल्याशी मनसोक्त गप्पा मारतात, बोलतात आणि मनमेंदूला अंतर्मुखही करतात. या रेषांची ही एकतत्त्वीय शैली म्हणून चित्रसृष्टीत भिन्न अनुभूती देते. इतर अमूर्त चित्रांपेक्षा वेगळाच भाव प्रकट करते. या चित्रांमुळे कविता, कथात्म वाङ्मय प्रकाराचा आशय अधिक समृद्ध बनतो. या कारणांमुळेच अंभोरेंच्या रेषांना अत्याधुनिक युगातही तेवढीच डिमांड असलेली जाणवते.

श्रीधर अंभोरेंच्या रेषांमधली झाडं मुळात लक्षवेधी असतात. पशू, पक्षी, गायी, बकऱ्या, मोर, कावळे, जमिनीवर पडलेली साधी दगडं सुद्धा आपल्याला आकृष्ट करतात. सजीवनिर्जीव या प्राणी जगताच्या दोन महत्त्वाच्या बाजू. चित्रकारालाच त्याची खरी ओळख असते. अस्ताव्यस्त पडलेल्या दगडात सजिवता वाहती ठेवण्याचं कार्य ही रेषा करते. 'मोर' हा जंगलातील इतर प्राण्यांसारखा एक पक्षी पण मोराचं हे राजवर्खी नर्तन जेव्हा रेषांमधून प्रकट होते. तेव्हा ते मनाला मोहून टाकते. त्यांच्या रेषाचं आणखी एक वैशिष्ट्य असं की, ऋतुरंग केवळ हिरव्या, पिवळ्या, पांढऱ्या इत्यादी सप्तरंगातून दाखवता येतात. मात्र या परंपरागत भावनेला छेद देवून त्यांनी काळ्या रेषांना चित्रकलेच्या क्षितिजावर कोरले हा लक्षणीय बदल म्हणता येईल.

खरं म्हणजे या रेषांवर बोलण्यापेक्षा या रेषांमध्ये मनसोक्त डुंबून जाणं कुणालाही आवडेल. इतक्या या रेषा लळा लावतात हेही तितकंच सत्य आहे. असा हा माणूसवेडा चित्रकार आहे. त्यामुळं जिथं जिथं अमानुषता जाणवते तिथं त्यांची रेषा फटकारते. 'बाभुळबन' त्यांच्या रेषांमध्ये हटकून येतंच. कारण, लहानपणापासून त्यांच्या मनमेंदूत ते शिरलं आहे, त्यातून ही चित्रं गहिरं रूप धारण करतात. ठसठशीत वेदनेचा चेहरा रेखांकित करताना ते कधीही सुस्पष्ट दाखवत नाहीत, त्यामागचं कारण की, चेहरा हरवलेली माणसंच त्यांच्या अवती भोवताली वावरत असतात. म्हणूनही कदाचित त्यांच्या चित्रांना बहुदा चेहरा नसतोच. साधु संन्यासागत फिरणारं हे व्यक्तित्व सारखं राजकारणी नेत्यासारखं दौऱ्यावर असतं. त्यामुळे ते कुणाला कुठे आणि कधीही भेटू शकतात. या सगळ्या भेटींच्या परिपाकातूनच अंभोरेंची रेषा आकाराला येते.

मानवदृष्टीनं सजीव ठरलेल्या रेषांमुळे अंभोरेंची ओळख सातासमुद्रापार गेली आहे. विदर्भाच्या मातीत जन्मास आलेला हा अवलिया रेषाचित्रकार विदर्भ अथवा महाराष्ट्रापुरता सिमित राहीला नसून; त्यांची ओळख ग्लोबल बनली आहे. गुगल सर्चइंजिनवर श्रीधर अंभोरे पाहायला, वाचायला मिळतात. अमेरिकेतील जागतिक कीर्तीच्या कलादालनात आठ वर्षांच्या चित्रकारापासून ते पाब्लो पिकासोपर्यंत सगळ्यांना एकत्र बघणं विलक्षण आनंद देणारी बाब म्हणावी लागते. त्या कलादालनात अभोरेंची रेषाचित्र मांडली मांडली गेली. जगातील समग्र रसिकांनी ती डोळ्यांनी अनुभवली, पाहिली तिची अनुभूती खरोखरच केवळ अभोरेंसाठी आनंददायी नव्हती. तर नॅशनल आर्ट गॅलरी, न्यूयॉर्क मधील चित्र पाहताना विदर्भाच्या मातीतील हरेकांसाठी आनंद देणारी बाब होती.

एकंदरीत, सृष्टी आणि मानवाविषयी अपार कुतूहल आणि श्रद्धा असलेला हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा कलावंत बाया, माणसं व सृष्टीतील पशू, पक्षी, प्राण्यांना मनसोक्त रेखाचित्रांच्या कवेत हुबेहुब रेखाटतो. त्यामुळे त्यांची चित्र मनात सतत कुतूहल जागवत राहतात.

**- उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख,**
**श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**
**आकोट जि. अकोला**
**मो. ९४२१७४७४१७**

# ध्येयवादी नेतृत्वाचा संघर्षमय प्रवास

हितेश गोहकार
चंद्रपूर

२ फेब्रुवारी २०२३ चा दिवस... नागपूर विभाग शिक्षक मतदारसंघाची निवडणूक... दुपारी १२ वाजता वृत्तवाहिन्यांवर बातमी झळकू लागली– "सुधाकर अडबाले सर मतमोजणीच्या प्रत्येक फेरीत आघाडीवर!" हीच वार्ता सर्वत्र पसरत होती. जसजशी मतमोजणी पुढे सरकत होती, तसतसा वि.मा.शि. संघाच्या कार्यकर्त्यांमधील उत्साह शिगेला पोहोचत होता. दुपारी २ वाजल्यापासून मतमोजणी केंद्राबाहेर बँड वाजू लागले, फटाक्यांची आतषबाजी सुरू झाली आणि कार्यकर्ते जल्लोषात नाचू लागले. जणू विजय निश्चित झाल्याचीच भावना सर्वांच्या मनात होती.

अखेर तो ऐतिहासिक क्षण उजाडलाच. रात्री ८ वाजता सुधाकर गोविंदराव अडबाले यांना विजयी घोषित करण्यात आले. बारा वर्षांनंतर विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा गड पुन्हा जिंकण्याचा मान त्यांच्या अविरत संघषार्ला मिळाला. कणखर, अभ्यासू आणि संघर्षशील नेतृत्वाच्या बळावर त्यांनी हा विजय संपादन केला आणि तेथूनच सुरू झाले "सुधाकर पर्व."

सुधाकर अडबाले यांनी बालपणापासूनच संघर्ष अनुभवला. चंद्रपूरजवळील मोठा मारडा या गावातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. ग्रामीण शेतकरी कुटुंबातील मुलांना ज्या कठीण परिस्थितीचा सामना करावा लागतो, तो त्यांच्या वाट्यालाही आला. मात्र, शिक्षणाची प्रबळ जिद्द आणि चिकाटी यांच्या बळावर त्यांनी आपले आयुष्य घडविले.

त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत झाले. त्यानंतर माध्यमिक व पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी वर्धा येथे मोठे बंधू निळकंठराव अडबाले यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. पाचवी ते सातवीपर्यंतचे शिक्षण लोक विद्यालयात, तर आठवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये झाले. बारावी ग्रामीण महाविद्यालयातून पूर्ण केल्यानंतर जे. बी. विज्ञान महाविद्यालय, वर्धा येथून विज्ञान शाखेची पदवी संपादन केली. त्यानंतर चंद्रपूर येथील जनता महाविद्यालयातून बी.एड. पदवी प्राप्त केली. बी.एड. पूर्ण होताच २० जुलै १९८७ रोजी जनता विद्यालय, पिपरी येथे सहायक शिक्षक म्हणून त्यांनी सेवेला प्रारंभ केला. १९८८ मध्ये जनता विद्यालय, घुग्घुस येथे त्यांची बदली झाली. याच विद्यालयात सुरू झालेला त्यांचा शिक्षकी पेशाचा प्रवास ३१ ऑगस्ट २०१८ रोजी सेवानिवृत्तीपर्यंत अखंड सुरू राहिला.

शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना घडविताना त्यांनी सामाजिक आणि सहकार क्षेत्रातही आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटविला. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने त्यांनी 'नागपूर विभाग शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था' स्थापन केली. २००४ मध्ये अवघ्या १३ शाळा, १३९ सभासद आणि ४२ हजार रुपयांच्या भागभांडवलावर सुरू झालेली ही पतसंस्था आज एका विशाल वटवृक्षात रूपांतरित झाली आहे. आज या संस्थेचे कार्यक्षेत्र नागपूर विभागातील सहा महसुली जिल्ह्यांमध्ये विस्तारले असून पूर्व विदर्भात १६ शाखा कार्यरत आहेत. ७,७११ सभासद आणि सुमारे ७५० कोटी रुपयांचा उलाढाल असलेली ही संस्था आता अमरावती विभागातही विस्तारली असून अमरावती जिल्ह्यात शाखा सुरू करण्यात आली आहे.

अडचणीत सापडलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आर्थिक आधार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्थेने सातत्याने केले आहे. सभासदाचे कोणत्याही कारणाने निधन झाल्यास त्याच्याकडील १०० टक्के कर्ज माफ करणारी ही महाराष्ट्रातील एकमेव पतसंस्था आहे. कोरोनाकाळात निधन झालेल्या अनेक शिक्षक व शिक्षकेत्तर सभासदांचे संपूर्ण कर्ज संस्थेने माफ केले. तसेच राज्य शासनाच्या मदतनिधीसाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत १ लाख रुपयांची आर्थिक मदतही दिली. विविध सामाजिक उपक्रमांमुळे सभासदांमध्ये संस्थेबद्दल आत्मीयता आणि विश्वास निर्माण झाला असून, या विश्वासाचे श्रेय सुधाकर अडबाले यांच्या दूरदृष्टीला आणि प्रभावी नेतृत्वाला जाते.




विदर्भ माध्यमिक शिक्षक संघातील त्यांचा प्रवेशही त्यांच्या लढाऊ स्वभावामुळेच झाला. शिक्षकांच्या विविध प्रश्नांसाठी आंदोलने करताना ते संघटनेशी जोडले गेले. १९८८ मध्ये ते संघटनेचे आजीवन सभासद झाले. १९९८ मध्ये चंद्रपूर जिल्हा संघटक, २००२ मध्ये जिल्हाध्यक्ष आणि २५ ऑक्टोबर २०१५ रोजी प्रांतीय सरकार्यवाह म्हणून त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली. आजही ते हे पद यशस्वीपणे सांभाळत आहेत. २१ मार्च २०२१ रोजी संघटनेच्या लोकशाही परंपरेनुसार त्यांची नागपूर विभाग शिक्षक मतदारसंघासाठी अधिकृत उमेदवार म्हणून घोषणा करण्यात आली. त्यांच्या परिवारात यापूर्वी ग्रामपंचायत सदस्यही नसताना त्यांनी प्रतिष्ठेची ही निवडणूक पहिल्याच प्रयत्नात विक्रमी मतांनी जिंकली. हा विजय त्यांच्या कायार्चा आणि जनविश्वासाचा सन्मान होता.

विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी त्यांचा संघर्ष आजही अखंड सुरू आहे. १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू होईपर्यंत सभागृहात आणि सभागृहाबाहेरही लढा सुरू ठेवण्याचा त्यांचा निर्धार आहे.

८ फेब्रुवारी २०२३ रोजी त्यांनी जुनी पेन्शन योजनेची टोपी आणि दुपट्टा परिधान करून विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. विधानपरिषदेतील त्यांच्या पहिल्याच भाषणातून शिक्षकांच्या प्रश्नांची प्रभावी मांडणी झाली. त्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीचे कौतुक स्वतः सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. गेल्या आठ अधिवेशनांत त्यांनी शिक्षकांसह सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवून आपल्या कार्याची वेगळी छाप निर्माण केली आहे.

निवडणुकीपूर्वी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह म्हणून ते विदर्भातील अकरा जिल्ह्यांत सातत्याने दौरे करीत असत. आंदोलने, बैठका, मोर्चे आणि शिक्षकांच्या समस्या सोडविण्याची धडपड हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. अनेकदा पद मिळाल्यानंतर लोकांचा जनसंपर्क कमी होतो; मात्र सुधाकर अडबाले यांच्या बाबतीत याच्या नेमके उलट चित्र दिसते. आमदार झाल्यानंतरही त्यांनी आपला जनसंपर्क आणि संघर्ष कायम ठेवला आहे.

आज त्यांना आमदार म्हणून निवडून येऊन साडेतीन वर्षे पूर्ण होत आहेत. या काळात एकही दिवस त्यांनी विश्रांती घेतलेली दिसत नाही. नागपूर व अमरावती विभागातील अकराही जिल्ह्यांत ते सातत्याने दौरे करून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी अहोरात्र प्रयत्नशील आहेत. अल्पभूधारक शेतकरी कुटुंबात जन्मलेला एक सामान्य मुलगा ते शिक्षक आमदार असा त्यांचा तब्बल ६६ वर्षांचा संघर्षमय प्रवास आज असंख्य शिक्षक, विद्यार्थी आणि तरुणांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. १० ऑगस्ट २०२६ रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त आदरणीय आमदार श्री. सुधाकर अडबाले सर यांना उत्तम आरोग्य, उदंड आयुष्य आणि निरंतर यशासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!